शनिवार, २२ ऑक्टोबर २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक ९५
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

कवठेमहांकाळमध्ये राष्ट्रवादीत फूट; भाजपचा नगराध्यक्ष/२
शासनाच्या आनंदाचा शिधा वितरणास पनवेलमध्ये प्रारंभ/३
विंडीज वर्ल्डकपमधून 'आऊट'; आयर्लंडचा मोठा विजय/८

## आता सगळ्यांनी मोकळा श्वास घेतलाय -मुख्यमंत्री शिंदे

**मुंबई :** येथील छत्रपती शिवाजी पार्कवर शुक्रवारी (दि. २१) महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा दीपोत्सव कार्यक्रम उत्साहात झाला. या कार्यक्रमास राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या हस्ते दीपोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाविकास आघाडी सरकारविरोधात जोरदार टोलेबाजी केली. या वर्षी सर्व सण-उत्सव उत्साहात साजरे करण्याचे आमच्या सरकारने ठरविले होते. हे वचन आम्ही पाळले आहे. आतापर्यंत सर्व दबून बसले होते, पण आता सगळ्यांनी मोकळा श्वास घेतला आहे, असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.





श्री. नरेंद्र मोदी
मा. पंतप्रधान

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन



महात्मा जोतिराव फुले

# महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभ

## उजळे प्रकाश प्रगतीचा
## ध्यास वचनपूर्तीचा




## योजनेचा शुभारंभ
### महाराष्ट्र शासनाची वचनपूर्ती

राज्यातील ७ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये
दि. २० ऑक्टोबर,२०२२ रोजीच्या कार्यक्रमात
मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते
रिमोट क्लीक वरुन रु. २५०० कोटी रक्कम थेट जमा.

### योजनेची वैशिष्ट्ये

- राज्यातील अल्पमुदतीच्या पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रु. ५० हजारपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा ऐतिहासिक निर्णय.
- नियमित पीक कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देणारे महाराष्ट्र हे देशांतील पहिले राज्य.
- प्रोत्साहनपर लाभ योजनेची संपूर्ण अंमलबजावणी ऑनलाईन पद्धतीद्वारे.
- २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या पैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षांत पीक कर्जाची उचल घेऊन नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ.
- राज्यात झालेल्या अतिवृष्टी व महापूरामुळे नुकसान झाल्याने नैसर्गिक आपत्ती अंतर्गत कर्जमाफीचा लाभ मिळालेले शेतकरी सुद्धा योजनेस पात्र.
- शेतकरी मयत झाल्यानंतर त्यांच्या वारसांनी कर्जाची परतफेड केली असल्यास वारस सुद्धा प्रोत्साहनपर योजनेच्या लाभास पात्र.
- राज्यातील अंदाजे १६ लाख पात्र शेतकऱ्यांना रु. ४७०० कोटी प्रोत्साहनपर लाभ देण्याचे प्रस्तावित.
- उर्वरित सर्व पात्र लाभार्थ्यांना नोव्हेंबर २०२२ अखेर लाभ देण्यास राज्यशासन कटिबद्ध

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
महाराष्ट्र शासन

श्री. अतुल सावे
मा. मंत्री (सहकार)

श्री. देवेंद्र फडणवीस
मा. उपमुख्यमंत्री

श्री. एकनाथ शिंदे
मा. मुख्यमंत्री

# ‘सारथी’साठी शासन सर्वतोपरी मदत करणार

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची नाशिकमध्ये ग्वाही

**नाशिक : प्रतिनिधी**

‘सारथी’च्या नाशिक विभागीय कार्यालयाच्या माध्यमातून विभागातील मराठा व मराठा-कुणबी समाजातील तरुणांच्या सर्वांगिण विकासाला चालना मिळणार असून तरुणांचे भविष्य घडविणाऱ्या सारथीला शासनाकडून सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

छत्रपती शाहू महाराज, संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था ‘सारथी’ पुणे या संस्थेच्या नाशिक विभागीय कार्यालयाच्या उद्घाटन कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. या वेळी राज्याचे बंदरे व खनिकर्म मंत्री तथा नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे, खासदार हेमंत गोडसे, आमदार नरेंद्र किशोर दराडे, दिलीप बनकर, अॅड. राहुल ढिकले, देवयानी फरांदे, सीमा हिरे, छत्रपती संभाजीराजे भोसले, सारथीचे अध्यक्ष मधुकर कोकाटे, विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे, पोलीस महानिरीक्षक बी. जी. शेखर-पाटील, जिल्हाधिकारी गंगाथरन डी., पोलीस अधीक्षक सचिन पाटील, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अशीमा मित्तल, सारथीचे व्यवस्थापकीय



संचालक अशोक काकडे, उपव्यवस्थापकीय संचालक नितीन गावंडे तसेच पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

या वेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती शाहू महाराजांच्या विचार, प्रेरणेतून सर्वसामान्य लोकांच्या मनातले कल्याणकारी कार्य शासन करीत आहे. मराठा समाजातील तरुणाईला कौशल्य विकासाचे धडे देण्याबरोबरच त्यांचा शैक्षणिक, सामाजिक आणि अर्थिक विकास होण्यासाठी एक कालबद्ध कार्यक्रम सारथीच्या माध्यमातून हाती घेण्यात आला आहे. नाशिक येथे उभारण्यात आलेले सारथीचे हे कार्यालय केवळ एक शासकीय वास्तू नसून ते अनेक तरूणांच्या भविष्याचे शिल्पकार असलेली प्रेरणा आहे. छत्रपती शाहू महाराजांचा राजमुकुट हे सारथीचे बोधचिन्ह असून ते दीनदुबळ्यांच्या हक्कासाठी, न्यायासाठी लढायची प्रेरणा देणारे चिन्ह आहे.

नाशिक विभागीय कार्यालयाच्या माध्यमातून सारथीला आपला दृष्टिकोन केवळ कागदावरच न ठेवता तो कृतीत आणण्याची संधी मिळाली आहे. व्यापक जनहितासाठी काम करीत असताना प्रसंगी कुठलेही धाडसी निर्णय घेण्याची वेळ आली तरी ते घेण्याची तयारी असल्याचे सांगून मराठा समाजातील जे तरुण स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊनही नियुक्तीपासून वंचित होते, त्यांच्यासाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली आहेत. मराठा समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी जे जे काही शक्य आहे ते शासन करत राहील, असेही या वेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

या वेळी दिवाळीच्या शुभेच्छा देताना गरजू लोकांना शासनामार्फत दिली जाणारी शिधाभेट साखर, रवा, तेल व चणाडाळही वेळेत सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्याच्या सूचनाही प्रशासनास दिल्या. सततच्या पावसाने शेतकरी अत्यंत कठीण परिस्थितीतून जातो आहे. त्यासाठी व्यापक स्वरूपाचे परिणामकारक निर्णय घेतले असल्याचे सांगताना मुख्यमंत्री शिंदे यांनी एनडीआरएफच्या निकषांपेक्षा दुपटीची मदत शेतकरी बांधवांना देण्याबरोबरच निकषांत न बसणाऱ्या व सततच्या पावसाने झालेल्या नुकसानीपोटीही भरपाई दिली जाणार असल्याचे सांगितले.

# कवठेमहांकाळ नगरपंचायतीत राष्ट्रवादीची मते फुटली

## रोहित पाटलांची सत्ता संपुष्टात; नगराध्यक्षपदी भाजपचा उमेदवार विजयी



**सांगली : प्रतिनिधी**

सांगली लोकसभा मतदारसंघाचे भाजप खासदार संजय पाटील यांच्या गटाकडून राष्ट्रवादीचे दिवंगत नेते आर. आर. पाटील यांचे सुपुत्र रोहित पाटील यांच्या गटाचा पराभव झाला. राष्ट्रवादीचे चार नगरसेवक फुटल्यामुळे कवठेमहांकाळ नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत भाजप खासदार समर्थक उमेदवाराचा विजय झाला.

सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ नगरपंचायतीमध्ये राष्ट्रवादीचे बहुमत असूनही खासदार संजय पाटील गटाच्या सिंधू गावडे निवडणुकीत विजयी झाल्या. यामुळे राष्ट्रवादीचे युवा नेते रोहित पाटील यांना मोठा धक्का बसला आहे. नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादीकडून राहुल जगताप यांना उमेदवारी देण्यात आली होती, तर भाजप खासदार व विरोधी गटाकडून सिंधु गावडे यांना उमेदवारी देण्यात आली होती, मात्र निवडणुकीच्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे १० पैकी चार सदस्य फुटले.

राहुल जगताप आणि सिंधु गावडे यांना प्रत्येकी आठ मते मिळाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी चिठ्ठीवर सोडत घेतली. ज्यामध्ये सिंधु गावडे निवडून आल्या. त्यामुळे नगराध्यक्ष निवडणुकीत सिंधुताई गावडे यांचा विजय झाला असून राष्ट्रवादीचे युवा नेते रोहित आर आर पाटील यांची सत्ता अखेर संपुष्टात आली.

# अल्पसंख्याक महिलांसाठी होणार बचत गटांची निर्मिती

## शिंदे-फडणवीस सरकारचे भाजप महिला मोर्चाकडून अभिनंदन

**मुंबई : प्रतिनिधी**

अल्पसंख्याक महिलांच्या आर्थिक विकासासाठी नवीन दोन हजार बचत गटांची निर्मिती करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्याचबरोबर, माता सुरक्षित तर घर सुरक्षित या विशेष मोहिमेत महिलांच्या आरोग्य तपासणीसाठी प्रत्येक जिल्ह्याला दोन कोटी रुपये निधी देण्याचा निर्णयही सरकारने घेतला आहे. याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे भाजपच्या महिला मोर्चा प्रदेशाध्यक्षा आमदार उमा खापरे यांनी अभिनंदन केले आहे. महिलांच्या सक्षमीकरणाबरोबरच महिलांच्या आरोग्याकडेही राज्य सरकार लक्ष देत आहे, असेही आमदार खापरे यांनी म्हटले आहे.



आमदार उमा खापरे यांनी, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून अल्पसंख्याक महिलांच्या आर्थिक विकासासाठी औरंगाबाद, अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, हिंगोली, जालना, उस्मानाबाद, लातूर, बीड, चंद्रपूर, वर्धा, भंडारा, गोंदीया, गडचिरोली या १५ जिल्ह्यांमध्ये सुमारे नवीन २८०० बचतगटांची निर्मिती महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत करण्यात येणार आहे. नांदेड, कारंजा (जि. वाशिम), परभणी, औरंगाबाद, नागपूर या पाच शहरांमध्ये महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत अल्पसंख्याक महिलांसाठी स्वयंसहाय्यता बचत गट सध्या स्थापन करण्यात आलेले आहेत.

माता सुरक्षित तर घर सुरक्षित मोहिमेत राज्यातील अंदाजे चार कोटी महिलांची आरोग्य तपासणी व औषधोपचार करण्यात येणार आहे. यामध्ये १८ वर्षांवरील महिला, माता, गरोदर स्त्रीया यांचा समावेश आहे. महिलांना शिबीराच्या ठिकाणी आणणे व घरी पोहचविणे आणि औषधांकरिता मिळून एक कोटी आणि शहरी आणि महापालिका क्षेत्रासाठी एक कोटी असे प्रत्येक जिल्ह्यासाठी दोन कोटी रुपये निधी देण्याचा निर्णयही राज्य सरकारने घेतला आहे.

या निर्णयामुळे महिलांचे आरोग्य राखण्यास मदत होणार आहे, असेही आमदार उमा खापरे यांनी पत्रकात म्हटले आहे.

# आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नाने कोप्रोली गावातील डंम्पिग ग्राउंडचा प्रश्न मार्गी

**उरण : वार्ताहर**

कोप्रोली ग्रामपंचायतीच्या सरपंच अलका सतिश म्हात्रे आणि सर्व ग्रामपंचायत सदस्यांनी गावातील डंम्पिग ग्राउंडच्या समस्येबाबत आमदार महेश बालदी यांची भेट घेऊन कायमची उपाययोजना करण्याची मागणी केली होती. त्यानुसार आमदार महेश बालदी यांनी सिडको प्रशासनाशी चर्चा करून पर्यायी जागा उपलब्ध करण्याबाबत सूचना केल्या. त्यामुळे कोप्रोली गावातील हा प्रश्न मार्गी लागला आहे.

कोप्रोलीतील डंम्पिग ग्राउंडमुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे सरपंच आणि सदस्यांनी यातून मार्ग काढण्यासाठी आमदार महेश बालदी यांची भेट घेतली. आमदार महेश बालदी यांनी तातडीने सिडकोच्या मुख्य अधिकाऱ्यांशी चर्चा करून पर्यायी जागा उपलब्ध करण्याबाबत सूचना केली. त्यामुळे ग्रामस्थांतर्फे



आमदार बालदी यांचे आभार मानण्यात आले.

या वेळी उरण तालुका भाजप अध्यक्ष रवि भोईर, पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, उपसरपंच रुपाली देवेंद्र म्हात्रे, माजी उपसरपंच विपुल म्हात्रे, माजी उपसरपंच शुभांगी योगेश म्हात्रे, माजी उपसरपंच निरज पाटील, पाणी कमिटी सभापती दत्तराज म्हात्रे, कोप्रोली भाजप गावअध्यक्ष सचिन गावंड, भाजप तालुका वाहतूक अध्यक्ष सुदेश पाटील, देवेंद्र पाटील, तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, सारडे ग्रामपंचायत सदस्य भार्गव म्हात्रे, कुणाल पाटील, गिरीष पाटील, युवा सचिव कल्पेश म्हात्रे, धनेश गावंड, बाळा गावंड, सुशांत पाटील आदी उपस्थित होते.




# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात स्वच्छता अभियान उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या स्वच्छता अभियानात राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुमारे ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व महाविद्यालयाच्या परिसराची स्वच्छता केली. या स्वच्छता अभियानाचा मुख्य हेतू विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती करणे व वैयक्तिक जीवनामध्ये स्वच्छतेला महत्त्व दिले पाहिजे हे होते.

प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड यांनी राष्ट्रीय विद्यार्थ्यांना स्वच्छता मोहिमेसाठी शुभेच्छा दिल्या व स्वच्छते विषयी महत्त्व पटवून दिले. या स्वच्छता अभियानाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा. प्रथमेश ठाकूर यांनी केले तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. राजश्री मात्रे, प्रा. कावेरी घोगरे, प्रा. भाग्यश्री शुक्ला, प्रा. तनुजा सुमन यांनी सहकार्य केले.

# सोनारी ग्रामपंचायत उपसरपंचपदी रेश्मा कडू

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील सोनारी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भारतीय जनता पक्षाच्या महिला मंडळाच्या अध्यक्षा रेश्मा नंदकुमार कडू यांची निवड झाली आहे.

त्याबद्दल त्यांचे आमदार महेश बालदी, उरण तालुका भाजप अध्यक्ष रवी भोईर, उरण शहर भाजप अध्यक्ष कौशिक शहा, तालुका महिला अध्यक्ष राणी म्हात्रे, तालुका सरचिटणीस निर्मला घरत, भाजप महालन विभाग अध्यक्ष महेश कडू व सरपंच पूनम महेश कडू आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. नवनिर्वाचित उपसरपंच रेश्मा कडू यांनी या वेळी गावाच्या विकासासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले.




# नागरिकांना धान्यकिट वाटपास सुरुवात

## आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या हस्ते आग्रोली गावातून शुभारंभ

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शासनाच्या वतीने शिधाधारकांना १०० रुपयांना धान्यकिट वितरण करण्याचे जाहीर केले. बेलापूरच्या आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या हस्ते बेलापूर आग्रोली गावातील शिधावाटप केंद्रातून धान्यकिट वाटपाची सुरुवात करण्यात आली. या वेळी नवी मुंबई मनपा माजी विरोधी पक्षनेत्या सरोज पाटील, माजी नगरसेविका राजेश्री कातकरी, सामाजिक कार्यकर्ते रोहिदास पाटील, सुभाष गायकवाड, सुधीर पाटील, निलेश पाटील, विनोद डोंगरे, संदीप पाटील शिधावाटप निरीक्षक शीतल लाडके, अमोल बराटे, केंद्रचालक प्रमोद कंबोटकर तसेच लाभार्थी उपस्थित होते.




आमदार मंदाताई म्हात्रे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी गोरगरिबांची दिवाळी ही आनंदात जावी, या हेतूने केवळ १०० रुपयांमध्ये धान्यकिट गोरगरिबांसाठी भेट पाठवले आहेत. नवी मुंबईतील आग्रोली गावातून याची सुरुवात होत आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गेल्या दोन वर्षांनंतर दिवाळी साजरी होत असल्याने नागरिकांना वेळेत धान्य मिळाल्याने त्यांची दिवाळी ही आनंदमयी होणार आहे. लाभार्थी असूनही धान्यकिट न मिळाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यास दुकानदारांवर कारवाई करण्यात येईल. दिवाळी प्रदूषणमुक्त, फटाके उडवताना काळजी घेऊन साजरी करण्याचे आवाहन करून आमदार मंदाताई म्हात्रे यांनी शुभेच्छा दिल्या.

# पनवेलच्या वडाळे तलावावर आज दीपोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दोन वर्षांच्या कालावधीनंतर यंदा सर्वच सण-उत्सव उत्साहात साजरे केले जात आहेत. आता दीपावलीनिमित्त पनवेलच्या वडाळे तलाव येथे शनिवारी (दि. २२) सायंकाळी ६.३० वाजता तिमिरातुनी तेजाकडे : दीपोत्सव साजरा करण्यात येणार आहे.



सर्व पनवेलकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रेमाची व आपुलकीची ज्योत पेटवून दीपोत्सव साजरा करूया, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ, सीकेटी महाविद्यालय एनएसएस विभाग, सोसायटी मित्र मंडळ, संस्कार भारती पनवेल समिती यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# नवी मुंबई पालिकेची कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट

## २२ जणांना पदोन्नती व ६३ जणांना आश्वासित प्रगती योजना लागू

**नवी मुंबई : बातमीदार**

नागरी सेवा सुविधांच्या पुर्ततेमध्ये नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी यांचे सक्रीय योगदान लक्षात घेत त्यांच्या पदोन्नत्या, आश्वासित प्रगती योजनांचा लाभ याविषयी गतिमान निर्णय घेण्याकडे महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्यामार्फत विशेष लक्ष दिले जात आहे.

पदोन्नती समितीने शिफारस केल्यानुसार महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी वरिष्ठ लिपिक (लेखा) या पदावरून १८ कर्मचाऱ्यांना उपलेखापाल, लेखा परीक्षक तसेच चार उपस्वच्छता निरीक्षकांना स्वच्छता निरीक्षक या पदावर पदोन्नती देत त्यांना दिवाळी भेट दिलेली आहे. त्याचप्रमाणे एक शाखा अभियंता, १० जोडारी, आठ प्लंबर, १५ मदतनीस, पाच मीटर वाचक, सात वायरमन, सात माळी, बहुउद्देशीय सेवक व १० शस्त्रक्रियागृह सहाय्यक अशा एकूण ६३ अधिकारी, कर्मचाऱ्यांना तीन लाभांचा सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. यामध्ये विशेषत्वाने चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचाही विचार करण्यात आलेला आहे.

याशिवाय ५० संवर्गातील ५८३ अधिकारी, कर्मचारी यांना तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी यांच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळ्याचा पदोन्नती व आश्वासित प्रगती योजनेचा लाभ हे दोन्ही प्रश्न मार्गी लागलेले असल्याने अधिकारी, कर्मचारीवृंदामध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# अनाथ बालकांना पनवेल मिशन वात्सल्य समितीकडून वस्तूवाटप



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**


कोविड-१९मुळे आई-वडील असे दोन्ही पालक गमावलेल्या चार अनाथ बालकांपैकी अनिकेत बाबू दडस (वय १७ वर्षे), स्वर्णिम अश्विन काकडे (वय चार वर्षे) या दोन अनाथ बालकांना जिल्हाधिकारी तथा मिशन वात्सल्य समितीचे अध्यक्ष डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकास्तरीय मिशन वात्सल्य समिती पनवेल, ग्राम स्वराज्य समिती महाराष्ट्र, रोटरी क्लब, हिंदाल्को कंपनी, युवा स्वयंसेवी संस्था यांच्यामार्फत दिवाळीनिमित्त मिठाई, फराळ, शालेय साहित्याचे वाटप तहसील कार्यालयात करण्यात आले.

राज कृष्णा पाटील (वय १५ वर्ष), सलोनी कृष्णा पाटील (वय १३ वर्षे) ही अनाथ भावंडे उपस्थित राहू न शकल्यामुळे त्यांच्या घरी जावून वस्तूंचे वाटप केले. या वेळी बालविकास प्रकल्प अधिकारी चेतन गायकवाड, विस्तार अधिकारी वैशाली वैद्य, हिंदाल्को कंपनीचे वरिष्ठ अधिकारी लहू रौंधाल, ग्राम स्वराज्य समिती महाराष्ट्रचे सचिव अल्लाउद्दीन शेख उपस्थित होते.

**दुखवटा**

## सन्मेष लोकरे

**अलिबाग :** पेशाने शिक्षक पण सांगितिक कला जोपासणारे सन्मेष सदानंद लोकरे यांचे नुकतेच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने गुरुवारी (दि.२०) निधन झाले. ते ५१ वर्षांचे होते.



२००१मध्ये पोलादपूर-रायगड येथील आयटीआय मधून त्यांची सेवा सुरू झाली. त्यानंतर पेण टेक्निकल हायस्कूल आणि निधनापूर्वी टेक्निकल हायस्कूल दादर-मुंबई येथे ते सेवेत होते. त्याबरोबर अलिबागेत आल्यावर कराओके सिंगिंग स्टार स्टुडिओत आपली सांगितिक आवड जोपासायचे. सन्मेष लोकरे यांचे अकाली निधनाने फार मोठी पोकळी निर्माण झाल्याची प्रतिक्रिया स्टुडिओचे सर्वेसर्वा राजेंद्र बोराडे आणि आशा बोराडे यांनी व्यक्त केली. सन्मेष यांच्या मागे त्यांची पत्नी, आई आणि दोन बहिणी असा परिवार आहे.

शनिवार, २२ ऑक्टोबर २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक ९५
www.ramprahar.com
राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

# शासनाच्या आनंदाचा शिधा वितरणास पनवेलमध्ये प्रारंभ

## आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती



या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील आसुडगाव येथे राज्य शासनाच्या आनंदाचा शिधा वितरण कार्यक्रम भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी (दि. २१) झाला. या माध्यमातून दिवाळीच्या निमित्ताने राज्यातील सुमारे सात कोटी सर्वसामान्य नागरिकांना चार वस्तूंचे वितरण करण्यात येत आहे.

राज्यातील गरिबांची दिवाळी गोड करण्याच्या दृष्टिकोनातून सरकारकडून प्रत्येकी एक किलो रवा, चणाडाळ, साखर आणि एक लिटर पामतेल स्वस्त दरात म्हणजेच १०० रुपयांमध्ये मिळणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने हे पाऊल उचलले आहे. महाराष्ट्रातील सर्व रेशनिंग दुकानांवर या चारही जीवनावश्यक वस्तू पोहचल्या आहेत. दिवाळीनिमित्त शासनाच्या माध्यमातून राज्यातील पात्र शिधापत्रिकाधारकांना, प्राधान्य कुटूंबातील शिधापत्रिकाधारकांना, अंत्योदय अन्न योजनेतील सुमारे एक कोटी ६२ लाख पात्र लाभार्थींना याचा लाभ मिळणार आहे. त्यानुसार पनवेलमधील आसुडगाव येथे वितरणाला सुरुवात झाली आहे.

या कार्यक्रमास तहसीलदार विजय तळेकर, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, माजी नगरसेविका शशिकला शेळके, भाजप ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, तालुका पुरवठा अधिकारी प्रदीप कांबळे, आसुडगाव सर्कल श्री. मोहिते, तलाठी आरती रेवसकर, माजी सरपंच शशिकांत शेळके, हरिश्चंद्र म्हात्रे, दशरथ शेळके, हसन अण्णा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# देशमुख, राऊतांची दिवाळी तुरूंगातच!

## सीबीआय कोर्टाने देशमुखांचा जामीन अर्ज फेटाळला

**मुंबई : प्रतिनिधी**



१०० कोटी वसुलीप्रकरणी अटकेत असलेले माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अनिल देशमुख यांचा जामीन अर्ज शुक्रवारी (दि. २१) केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) कोर्टाने फेटाळला. त्यामुळे त्यांची यंदाची दिवाळीही तुरूंगातच जाणार आहे.

अनिल देशमुख गेल्या ११ महिन्यांपासून तुरूंगात आहेत. त्यांच्यावर मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांनी १०० कोटी खंडणी गोळा करण्यास सांगितल्याचा आरोप केला होता. या प्रकरणी सीबीआय आणि सक्तवसुली संचालनालय (ईडी) दोघांनीही त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला होता. काही दिवसांपूर्वी ईडीच्या गुन्ह्यामध्ये देशमुखांना जामीन मिळाला. त्यानंतर सीबीआय कोर्टाने मात्र त्यांचा जामीन अर्ज फेटाळला आहे.

देशमुख यांच्यावरील गुन्हा गंभीर स्वरूपाचा आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारा आहे. देशमुख यांना कारागृहात योग्य ते वैद्यकीय उपचार मिळत आहेत. शिवाय या प्रकरणातील माफीचा साक्षीदार झालेले पोलीस अधिकारी सचिन वाझे यांच्या जबाबाकडे दुर्लक्ष करता येणार नाही, असे विशेष सीबीआय न्यायालयाने देशमुख यांना जामीन नाकारताना नमूद केले.

## राऊतांच्या जामीन अर्जावर आता २ नोव्हेंबरला सुनावणी



**मुंबई** : पत्राचाळ गैरव्यवहार प्रकरणात अटकेत असलेले शिवसेना खासदार संजय राऊत यांच्या जामीन अर्जावर आता २ नोव्हेंबरला सुनावणी होणार आहे. त्यामुळे राऊत यांची दिवाळी तुरूंगातच जाणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. या संदर्भात शुक्रवारी (दि. २१) झालेल्या सुनावणीत ईडीच्या वकिलांनी आपल्याला आणखी युक्तिवाद करायचा आहे, असे कोर्टाला सांगितले. त्याची नोंद घेत कोर्टाने २ नोव्हेंबरपर्यंत सुनावणी स्थगित केली आहे, कारण दिवाळीमुळे पुढचा आठवडा कोर्टाचे नियमित कामकाज बंद असेल.

## निवडक

### बदलापूरच्या कोंडेश्वर कुंडात बुडून चार तरुणांचा मृत्यू

**बदलापूर** : ऐन दिवाळीत बदलापूरजवळील कोंडेश्वर कुंडात बुडून चार तरुणांचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी (दि. २१) घडली. हे तरुण वाढदिवसाचे सेलिब्रेशन करण्यासाठी घाटकोपरमधून आले होते.

### नेरळ-माथेरान मिनीट्रेन आजपासून पुन्हा रूळावर

**कर्जत** : देशी-विदेशी पर्यटकांचे आकर्षण असलेली नेरळ-माथेरान मिनीट्रेन शनिवार (दि. २२)पासून पुन्हा धावणार आहे. २०१९मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे मिनीट्रेनच्या रूळांचे नुकसान झाले होते. त्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव मिनीट्रेनची सेवा बंद करण्यात आली होती. स्थानिकांच्या सोयीसाठी अमन लॉज ते माथेरानदरम्यान शटलसेवा सुरू होती.



**नवसारी (गुजरात) : गुजरात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नवसारी जिल्ह्यातील गणदेवी विधानसभा निवडणूक प्रभारीपदी भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष तथा पनवेल मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार त्यांनी तेथील भाजपच्या सर्व शक्तीकेंद्र प्रमुखांची भेट घेऊन मार्गदर्शन केले. त्यांच्यासमवेत उत्तर रायगड जिल्हा चिटणीस रमेश मुंडे, खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, विपूल चौटालिया उपस्थित होते. या वेळी सर्वांनी विजयाचा निर्धार केला.**

## आरोग्य विभागात होणार महाभरती

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात आरोग्य विभागामध्ये १० हजार पदांची भरती करणार असल्याची घोषणा ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांनी शुक्रवारी (दि. २१) पत्रकार परिषदेत केली. या संदर्भात येत्या १ ते ७ जानेवारीदरम्यान जाहिरात निघणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

मंत्री महाजन म्हणाले की, मार्च २०१८मध्ये आरोग्य विभागात १३ हजार जागांची भरती निघाली होती, मात्र मधल्या काळात याकडे दुर्लक्ष झाले. आता आम्ही १० हजार १२७ जागा भरणार आहोत. त्यासाठीचे वेळापत्रक निश्चित केले आहे.

### शेतकऱ्यांसाठी वचनपूर्ती

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून शिंदे-फडणवीस सरकारचे अभिनंदन!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन निधी देण्याची घोषणा करूनही महाविकास आघाडी सरकारने अडीच वर्षे त्यांची अंमलबजावणी केली नाही, पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारने या निर्णयाची अंमलबजावणी सुरू करून सात लाख शेतकऱ्यांना निधी दिला. शेतकऱ्यांसाठीच्या वचनपूर्तीबद्दल शिंदे-फडणवीस सरकारचे अभिनंदन, अशी प्रतिक्रिया भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. २१) व्यक्त केली.

ते पुढे म्हणाले की, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन निधी देण्याची घोषणा महाविकास आघाडी सरकारने अडीच वर्षांपूर्वी केली होती व दोन अर्थसंकल्पातही त्याचा उल्लेख केला होता, परंतु महाविकास आघाडी सरकारने याची अंमलबजावणी केली नाही. विरोधी पक्ष असताना भाजपने या विषयावर आंदोलनही केले होते. **(पान ५ वर..)**



## संपादकीय

# निसर्गशत्रूंशी दोन हात

निसर्गाचे संतुलन कोणी बिघडवले यावर काथ्याकूट करण्याची वेळ आता निघून गेली आहे. व्हायचे ते नुकसान झालेच आहे. जागतिक तापमानात आणखी वाढ झाल्यास हवामान बदलाचे भीषण दुष्परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागतील. ते रोखण्यासाठी कुणीतरी पुढाकार घेणे आवश्यक आहे. भारताने यासंदर्भात एक पाऊल पुढे टाकले ही बाब स्वागतार्ह तर आहेच, परंतु अभिमान वाटावा अशीच आहे. गुजरातमधील केवडिया येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरूवारी 'मिशन लाइफ' या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची घोषणा केली.

**आपल्या सभोवतालच्या वातावरणामध्ये वेगाने बदल होऊ लागला असून गेल्या काही वर्षांमध्ये अनेकदा अनपेक्षित आपत्तींना सामोरे जावे लागले. या आपत्तींमध्ये मानवनिर्मित संकटे होतीच आणि काही नैसर्गिक विपदांचाही समावेश होता. हवामानात घडून येणारे बदल हा जागतिक चिंतेचा विषय आहे. प्रगत देशांनी नैसर्गिक स्रोतांचा भरमसाट उपसा करून आपापल्या तिजोऱ्या भरल्या. आधुनिक जीवनशैलीच्या हव्यासापोटी निसर्गाची नासाडी केली. आपापली पोटे गच्च भरल्यानंतर याच महासत्ता आणि अन्य पुढारलेले देश विकसनशील देशांना उपदेशाचे डोस पाजू लागले आहेत. जागतिक तापमानवाढ रोखण्यासाठी मानवाने प्रगतीचा वेग आटोक्यात ठेवावा असा युक्तिवाद जागतिक व्यासपीठावरून वारंवार केला जातो. विकासाच्या मार्गावर वेगाने वाटचाल करणाऱ्या देशांना उद्देशून ही आग्रही भूमिका मांडण्यात येते. याच पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्र संघाचे सरचिटणीस अंतोनियो गुटेरस यांच्या उपस्थितीत पंतप्रधान मोदी यांनी भारताचा यासंदर्भातला विशाल दृष्टिकोन उलगडून सांगितला. 'मिशन लाइफ' हा नैसर्गिक संकटांपासून पृथ्वीचा बचाव करण्यासाठी तयार करण्यात आलेला एक वैश्विक कृती आराखडा आहे. पुढील महिन्यात इजिप्तमध्ये संयुक्त राष्ट्रांचे जागतिक तापमानवाढविषयक संमेलन पार पडत आहे. भारताने जाहीर केलेल्या मिशन लाइफ या उपक्रमाला तेथे खरा प्रतिसाद मिळेल. माणसामध्ये चिरंतन जीवनशैली रुजवण्यासाठी व तशाप्रकारचे जीवन स्वीकारण्यास उद्युक्त करण्यासाठी जागतिक पातळीवर मोहीम सुरू करण्यात येणार असून पंतप्रधान मोदी यांच्या रूपाने भारताला तिचे नेतृत्व करण्याची संधी मिळणार आहे. केवडिया येथे भाषण करताना पंतप्रधान मोदी यांनी पर्यावरणपूरक वर्तणुकीचे महत्त्व विशद केले. या वेळी त्यांनी तीन आरचा मंत्र दिला. रिड्युस (कमी वापर), रियूज (फेरवापर), रिसायकल (फेरप्रक्रिया) या तीन आरचा संकल्प आपण सर्वांनी केला पाहिजे. जागतिक तापमानवाढीविरोधात दोन हात करण्यासाठी भारत कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली. मिशन लाइफच्या माध्यमातून लोकानुकूल ग्रहाची संकल्पना अधिक बळकट होईल. यामध्ये पृथ्वीसाठी आणि पृथ्वीकडून ही दोन विचारसूत्रे केंद्रस्थानी असतील असे ते म्हणाले. वातावरणातील बदल आणि त्यामुळे येऊ घातलेल्या समस्या माणसाच्या हाताबाहेर गेल्या आहेत. कुठल्या एका देशाने धोरणनिश्चिती करून ही समस्या सुटणार नाही. सर्व देशांनी मिळून एकजुटीने प्रयत्न केल्यास पृथ्वीचे संरक्षण करणे नक्की शक्य होईल, असा विश्वास पंतप्रधानांनी या वेळी व्यक्त केला. संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरस यांनी पंतप्रधानांच्या विचारांना उघडपणे दाद दिली. जागतिक पातळीवर भारताचा दबदबा वाढतो आहे याचा पुरावाच या ठिकाणी दिसला. माणसाच्या उपभोगाच्या प्रवृत्तीमुळे तापमानवाढीचा प्रश्न जटिल होत गेला. मोदींसारख्या सकारात्मक वृत्तीच्या नेतृत्वाने त्यासंदर्भात पुढाकार घेतल्यास तापमानवाढीविरुद्धचे युद्ध नक्की जिंकता येईल, अशी खात्री जागतिक नेत्यांना वाटू लागली आहे.**

# संवेदनशील सरकारचा बळीराजाला आधार!

**खबरबात**
धम्मशील सावंत


कोकणातील रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या जिल्ह्यात यावर्षी जवळपास दोन लाख २५ हजार हेक्टरवर भाताची लागवड करण्यात आली आहे, मात्र परतीच्या पावसामुळे यंदा भातपिकाचे उत्पादन घटले आहे. सातत्याने बदलणारे ऋतूचक्र व हवामान बदलाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसतोय. सप्टेंबर अखेरपर्यंत कोसळणारा पाऊस आता ऑक्टोबरपर्यंत लांबला आहे. त्या पावसाने शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ केली आहे. जिल्हा प्रशासनाने अगदी कालपर्यंत नुकसान झालेल्या भागाचे पंचनामे युद्धपातळीवर करून शेतकऱ्यांना मदत देण्याचा संवेदनशील आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला दिला आहे. सरकार संकटग्रस्त शेतकऱ्यांना तत्परतेने मदत करीत आहे व त्यानुसार हा निर्णय झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

कोकणात भाताला शेतकऱ्याचे 'पिवळं सोनं' असे म्हटले जाते. सोन्यासारखे पिवळे पीक घेण्यासाठी शेतकरी ऊन वारा पावसात प्रचंड राबराब राबतो, मात्र परतीच्या पावसाने शेतकरी संकटात सापडलाय. गेल्या चार महिन्यांपासून कष्टाने पिकवलेले भातपिक आता वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. हातातोंडाशी आलेला घास या अवकाळी पावसामुळे हिरावून नेल्याने आता वर्षभर खायचं काय? जगायचं कसे? असा प्रश्न बळीराजाला पडलाय. त्यामुळेच शिंदे-फडणवीस यांच्या संवेदनशील सरकारने शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले आहेत. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत ५० हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम जमा करण्याचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गुरुवारी (दि. २०) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत झाला. एकाच वेळी राज्यातील सहा लाख ९० हजार शेतकऱ्यांच्या खात्यात सुमारे २५०० कोटी रुपये जमा करण्यात आले. अशा प्रकारे एकाचवेळी थेट खात्यात रक्कम जमा करणारे महाराष्ट्र पहिले राज्य आहे. अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीमुळे बळीराजाने खचून जाऊ नये. राज्य सरकार पाठीशी असल्याची ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

दरम्यान, शेतीच्या नुकसानीचे पंचनामे उपग्रह आधारीत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून करतानाच त्याची भरपाई ऑटोपायलट मोडच्या माध्यमातून देण्यासाठी यंत्रणा निर्माण करण्यात येत असल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. सध्या राज्यात परतीच्या पावसाने शेतीचे नुकसान झाले असून त्याचे पंचनामे तातडीने करून शेतकऱ्यांना मदत देण्याचे निर्देश दिले आहेत. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांनी खचून न जाता धैर्याने संकटाला सामोरे जा शासन आपल्या पाठीशी असल्याची ग्वाहीही मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी दिली. मुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे युतीचे सरकार सत्तेत आल्यानंतरच्या पहिल्याच बैठकीत नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णय

घेतला आणि त्याची अंमलबजावणीही केली. पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा होण्यासाठी पहिल्यांदाच एका क्लिकवर निधी जमा करण्यात आला आहे. दिवाळीपूर्वी ही रक्कम जमा झाल्याने शेतकऱ्यांची दिवाळी गोड करण्याचा प्रयत्न असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. अतिवृष्टीमुळे कालपर्यंत झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

राज्य शासनाने शेती आणि शेतकऱ्यांसाठी विविध निर्णय घेतले असून अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे करण्यासाठी उपग्रह आधारित यंत्रणा करण्यात येत आहे. त्यानंतर ऑटोपायलट मोडमध्ये विमा रक्कम मिळावी यासाठी तंत्रज्ञान तयार केले जात असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. या वेळी त्यांनी शेतकरी बांधवांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. योजनेचा लाभ देण्यासाठी पात्र शेतकऱ्यांच्या आधारक्रमांकाचे प्रमाणीकरण करण्यात आले असून सध्या सुमारे आठ लाख शेतकऱ्यांच्या आधार क्रमांकाचे प्रमाणीकरण झाले आहे. त्यापैकी सहा लाख ९० हजार शेतकऱ्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा करण्यात आले आहेत.



*ऑगस्टमध्ये अतिवृष्टीमुळे रायगड जिल्ह्यात ३३ टक्केपेक्षा जास्त नुकसान झालेल्या एकत्रित जिरायत पिकाखालील बाधित क्षेत्र २२४.४६ हेक्टर (आर) इतके आहे, तर जुलै २०२२ अतिवृष्टीमुळे ३३ टक्केपेक्षा जास्त झालेले नुकसान एकूण बाधित क्षेत्र १५०८.७० हेक्टर (आर) इतके आहे. सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात झालेल्या परतीच्या पावसाच्या नुकसानीचे पंचनामे सुरू असून एकत्रित अहवाल शासनाला सादर केला जाणार असल्याची माहिती जिल्हा कृषी कार्यालयातून देण्यात आली.*

**रायगडातील एकूण पेरणी क्षेत्र (हेक्टरमध्ये)**
**अलिबाग १३०७२, मुरूड ३२२६, पेण ११७३३, खालापूर २९३१, पनवेल ८२६८.९, कर्जत ९२५७.६, उरण २४६६.९, माणगाव १२४९१, तळा २२९१, रोहा १०४८९, सुधागड ४९५२.८, महाड १२१०७, पोलादपूर ३८१६.५, म्हसळा २५९७, श्रीवर्धन १४८७.५, एकूण पिकाखालील क्षेत्र १०६६०५, एकूण पेरणी क्षेत्र १०११८७**



**रायगड जिल्ह्यामध्ये भाताचे मुख्य पिक आहे. खरीपामध्ये साधारणपणे ९६ हजार हेक्टर क्षेत्र भाताखाली आहे. यामध्ये कृषि विभागाच्या अंतर्गत आपण वेगवेगळे तंत्रज्ञान प्रसाराच्यासाठी वेगवेगळ्या लागवड आणि चांगल्या दर्जाचे बियाण्यांचा प्रचार आणि प्रसार करीत असतो. मागील काही वर्षांपासून नैसर्गिक आपत्तीत अवकाळी पाऊस, बदलते हवामान याचा फटका भातपिकांना बसत आहे. जुलै व ऑगस्ट महिन्यात शेतकऱ्यांचे झालेले नुकसान यावर मदत वाटप झालेली आहे. सप्टेंबरमध्ये पावसाचा अधिक त्रास झाला नाही, तर ऑक्टोबरमध्ये काढणीच्या हंगामात अतिवृष्टी व परतीच्या पावसाने भातशेतीचे नुकसान झाले, त्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम सुरू आहे, अहवाल प्राप्त होताच अर्थ सहाय्यासाठी शासनाकडे आकडेवारी पाठवली जाईल, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य ती नुकसान भरपाई देण्यासाठी कृषी विभाग प्रयत्नशील आहे.**

**-उज्ज्वला बानखेले, जिल्हा कृषी अधीक्षक, विभाग रायगड**



## बदलते तंत्रज्ञान




# मुलांची शाळा सुटताच पालकांना मिळणार अलर्ट

गुगल त्यांचे फॅमिली लिंक ॲप नवीन वैशिष्ट्ये आणि नवीन फिचर्ससह सादर केले आहे. फॅमिली लिंकच्या नव्या आवृत्तीमध्ये तीन मोठी वैशिष्ट्ये प्रदान करण्यात आली आहेत. यामध्ये हायलाइट, कंट्रोल आणि लोकेशन आदींचा समावेश आहे.

नवीन ॲपमध्ये सूचनांसाठी मध्यवर्ती हबदेखील आहे. गुगलने फॅमिली लिंक पहिल्यांदा २०१७मध्ये सादर केली होती. गुगलच्या या ॲपमुळे पालकांना मुलांवर लक्ष ठेवणे सहज शक्य होणार आहे.

याशिवाय फॅमिली लिंक ॲप मुलांचा स्क्रीन टाईम आणि ॲप वापराविषयीदेखील माहिती देते. फॅमिली लिंकच्या मदतीने पालक त्यांच्या मुलांचे फोन किंवा टॅब्लेट लॉक करू शकतात, तसेच ॲप वापरण्यासाठी वेळदेखील सेट करू शकणार आहे. फॅमिली लिंक ॲपच्या नव्या अपडेटमुळे मुलांनी वापरलेल्या ॲप्सची हिस्ट्रीदेखील समजणार आहे. याशिवाय मुलांनी कोणतेही नवीन ॲप इन्स्टॉल केल्यास त्याची माहिती उपलब्ध होणार आहे. मुलांच्या फोनवर येणाऱ्या सर्व सूचनांची माहिती पालकांना या ॲपमध्येच मिळणार आहे.

फॅमिली लिंकच्या नव्या अपडेटमध्ये सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे लोकेशन टॅब आहे. यामुळे पालकांच्या फॅमिली लिंक ॲपमध्ये मुलांच्या फोनचे लाईव्ह लोकेशन बॅटरी लेव्हलसह दाखवले जाणार आहे. याशिवाय मुले शाळेमधून बाहेर पडताच पालकांना गुगल मॅपद्वारे त्याचा अलर्ट मिळणार आहे.

ॲपलच्या नवीन पॅरेंटल कंट्रोल्सनंतर गुगलने त्यांची फॅमिली लिंक री-डिझाइन केलेली आवृत्ती सादर केली आहे. ॲपलने आयओएस १६ सह अनेक पॅरेंटिंग फिचर्स सादर केली आहेत. ज्यात स्क्रीन टाइमसाठी क्विक स्टार्ट फिचर समाविष्ट करण्यात आले आहे.

# आंतरराष्ट्रीय कॅप्स लॉक दिन

दरवर्षी आंतरराष्ट्रीय कॅप्स लॉक दिन वर्षातून दोन वेळा साजरा केला जातो. एकदा २८ जून रोजी आणि २२ ऑक्टोबर रोजी. २०००मध्ये सर्वप्रथम हा दिवस साजरा केला गेला.

जगभरात इंटरनेटचा वापर करणारे अनेक जण आजच्या दिवशी कॅप्स लॉक ऑन करून फेसबूक आणि ट्विटर मेसेज अपडेट करून हा दिवस साजरा करतात. २०००साली डेरेक अर्नाल्डने सर्वप्रथम हा दिवस साजरा केला. विशेष म्हणजे आंतरराष्ट्रीय कॅप्स लॉक दिनासंदर्भात अधिकृत वेबसाईट अस्तित्वात आहे, तसेच त्यांचे स्वतःचे ट्विटर पेज आहे.

इतर दिवसांप्रमाणे तुम्हीही तुमच्या फेसबुक आणि ट्विटरवर कॅप्स लॉक ऑन करुन मेसेज टाईप करुन या दिवसामध्ये सहभाही होऊ शकता. आयोवामधील सॉफ्टवेअर डेव्हलपर डेरेक अरनॉल्ड यांनी २२ ऑक्टोबर हा दिवस म्हणून निवडला. जेव्हा प्रत्येकाने कॅप्स लॉक की, दाबली पाहिजे आणि फक्त मोठ्या अक्षरात टाइप केले पाहिजे. ते म्हणाले, आंतरराष्ट्रीय कॅप्स लॉक दिन हा खरे तर काही पाश्चात्य व्यक्तींच्या लहान मनाचा पुरावा आहे.

जगातील बहुसंख्य लोक लिपीमध्ये लिहितात ज्यात अक्षर आवरणाची संकल्पना नाही. म्हणून स्थानिक टायपोग्राफिकल अधिवेशने नाकारण्याचे निमित्त म्हणून या दिवसाची आळवणी करणाऱ्या कोणावरही हसू नये, असा सल्ला दिला जातो.

संगणक आणि शिफ्ट-लॉकच्या आधी, बहुतेक टाइपरायटर जुन्या काळात फक्त कॅपिटल अक्षरे तयार करीत असत. १८७०च्या दशकात, टाइपरायटर उत्पादक रेमिंग्टनने अप्पर आणि लोअरकेस दोन्ही अक्षरे टाइप करण्याचा एक किफायतशीर मार्ग शोधला. प्रत्येक टाईपबारवर दोन चिन्हे किंवा अक्षरे, जसे की अप्पर आणि लोअर केस-कागदावर अक्षरे मारणारा धातूचा तुकडा ठेवून असे केले.

दोन चिन्हांमध्ये अदलाबदल करण्यासाठी, लेखकांनी शिफ्ट की वापरली, जी संपूर्ण टाईप बार उपकरणे भौतिकरित्या हलवते.

आता, काही लोक कॅप्स लॉक की, बिली मेस की म्हणतात, जो फुशारकी आवाजासह इन्फोमर्शिअल आयकॉनचा संदर्भ आहे ज्याने आम्हाला ८०० नंबरवर कॉल करण्यासाठी आणि आत्ताच खरेदी करण्यास सांगितले. म्हणून जेव्हा मेस २८ जून २००९ रोजी मरण पावला, तेव्हा अरनॉल्डने कॅलेंडरमध्ये आंतरराष्ट्रीय कॅप्स लॉक डे साजरा करण्यासाठी दुसरा, जरी दुय्यम, दिवस जोडून श्रद्धांजली वाहिली.




## क्लिक...क्लिक...!



**पनवेल : दीपावली आणि त्यानिमित्त किल्ले यांचे अतूट नाते आहे. सध्या परतीच्या पावासाचा काही भरवसा नसल्याने मातीचे किल्ले भिजण्याची शक्यता आहे. त्यामुळे बच्चेकंपनीने रेडिमेड किल्ले खरेदीकडे आपला मोर्चा वळविला आहे.**

## आरोग्य प्रहर

# 'या' पदार्थांच्या सेवनाने सांधेदुखीवर मिळतो आराम



ऋतूबदलाप्रमाणे शरीरातही अनेक बदल होत असतात, या वेळी आपल्या जीवनशैलीत आवश्यक ते बदल न केल्यास आजारांचा धोका बळावतो. अलिकडे व्यायाम व सकस आहाराच्या अभावामुळे शरीराला आवश्यक ते पोषण मिळत नाही. परिणामी हाडे कमकुवत होऊन सांधेदुखीची समस्या वाढत आहे. तुम्ही ऑफिसच्या खुर्चीत किंवा झोपेतून उठल्यावर आळस देण्यासाठी हात लांब करता आणि हाडांचा कडकडण्याचा आवाज होतो. तुम्ही उठता- बसता सांध्यांमधून आवाज ऐकू येतो? हाडांमधून येणारा आवाज हा आजार नसून आजाराची सुरुवात आहे. त्यामुळे आहारातकाहीविशिष्ट भाज्यांचा समावेश नक्की करून पाहा...

**कांदा व लसूण** : सात्विक आहार घेण्यासाठी अनेकजण कांदा व लसूण खाणे टाळतात, पण आयुर्वेदात सांगितल्याप्रमाणे कांदा व लसूणात मुबलकर प्रमाणात सल्फर उपलब्ध असते, तसेच एनसीबीआई (नॅशनल सेंटर फॉर बायोटेक्नोलॉजी इनफार्मेशन) यांच्या माहितीनुसार, कांदा व लसूणात उपलब्ध सल्फरमुळे सांध्यांना सूज येण्याचे तसेच सांधेदुखीचे प्रमाणही कमी होते. कच्च्या कांद्याचे सेवन सांध्यांच्या मजबुतीने काम करते.

**लाल भोपळी मिरची** : भोपळी मिरची किंवा शिमला मिरचीमध्ये व्हिटॅमिन ए, बी, सी व के मुबलक प्रमाणात उपलब्ध असतात. व्हिटॅमिन ए मुळे त्वचा, हाडे व दातांचे आरोग्य सुधारण्यात मदत होते. मेडलाइन प्लसच्या माहितीनुसार लाल रंगाच्या भोपळी मिरचीत आढळणारे व्हिटॅमिन के हे हाडांच्या मजबुतीसाठी उपयुक्त असते, तसेच लाल भोपळी मिरचीच्या सेवनाने सांध्यांची लवचिकता वाढते व ल्युब्रिकेशन तयार होण्यातही मदत होते.

**आले** : ऋतूबदलात उत्तम आरोग्यासाठी आल्याचे सेवन अत्यंत गुणकारी ठरू शकते. आल्यात असणाऱ्या अँटी इंफ्लेमेटरी सत्वांमुळे जॉइंट्स दुखत असल्यास आराम मिळतो, तसेच हाडांचे आरोग्य सुधारण्यासाठी मदत होते. गरम पाण्यात आल्याचे तुकडे उकळून प्यायलावर पोटाचे आरोग्य सुधारण्यातही मदत होते.

**बीन्स** : घेवडा, राजमा यांसारखे बीन्स प्रोटीन व फायबरचे मोठे स्रोत असतात. या बियांमध्ये फ्लेवोनोइडसह अँटी इंफ्लेमेटरी व अँटी ऑक्सिडेंट उपलब्ध असतात. ज्यामुळे शरीराला येणारी सूज व सांधेदुखी कमी होण्यास मदत होते.

# आमदार भास्कर जाधवांवर गुन्हा दाखल करा

## दक्षिण रायगड भाजपची मागणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे नेते केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या शिवसेना ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांच्या विरोधात गुन्हा दाखल करावा, अशी मागणी दक्षिण रायगड भाजपने रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस समीर राणे, सांस्कृतिक प्रकोष्ठ संयोजक केदार आठवले, ओबीसी सेल अलिबाग तालुका अध्यक्ष अशोक वारगे, अलिबाग तालुका युवा मोर्चा अध्यक्ष आलाप मढवी, आदित्य नाईक, रामराज विभाग अध्यक्ष अजिंक्य पाटील यांनी रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले.

उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे आमदार भास्कर जाधव यांनी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केले आहे. त्याबद्दल आमदार जाधव यांच्या विरोधात गुन्हा दाखल करावा, अशी मागणी जिल्हा पोलीस अधीक्षकांना दिलेल्या या निवेदनात करण्यात आली आहे.



# वाकस आदिवासीवाडीत भिंत कोसळून तिघे जखमी

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील वाकस ग्रामपंचायत हद्दीतील वाकस कातकरीवाडीमधील एका आदिवासी कुटुंबाचे विटा मातीच्या घराची भिंत गुरुवारी सायंकाळी सरत्या पावसामुळे कोसळली. त्यात तीन व्यक्ती जखमी झाल्या आहेत. त्यांच्यावर उपचार सुरु असून, जखमींपैकी एक महिला गंभीर असल्याचे सांगण्यात आले.

वाकस ग्रामपंचायत हद्दीमध्ये कशेळे रस्त्यावर कातकरी लोकांची वस्ती असून तेथे मंगल भोईर हे कुटुंबासह राहतात. गुरुवारी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास मंगल भोईर यांच्या विटामातीच्या घराची भिंत कोसळली. या घटनेत लक्ष्मी एकनाथ मुरकुटे तथा भोईर या गंभीर जखमी झाल्या, तर दीपक भोईर आणि मंगल भोईर हे किरकोळ जखमी झाले. या घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली आणि जखमींना तात्काळ रायगड हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मंगल भोईर यांच्या कुटुंबाला लवकरात लवकर शासनाचे घरकूल देण्याचा निर्णय आम्ही घेऊ अशी माहिती सरपंच संजना संजय तांबोळी आणि ग्रामविकास अधिकारी तारामती दातीर यांनी दिली.



# पेण अर्बन बँक संघर्ष समिती सदस्यांची दिवाळीनंतर मुख्यमंत्र्यांसोबत बैठक

**कर्जत : प्रतिनिधी**

पेण अर्बन बँक संघर्ष समिती सदस्य आणि ठेवीदार यांची सभा आमदार महेंद्र थोरवे यांच्या कार्यालयात पार पडली. या वेळी संघर्ष समितीच्या सदस्यांनी आपल्या व्यथा मांडल्या. त्यावर आमदार थोरवे यांनी दिवाळीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर बैठक आयोजित करण्याचे आश्वासन दिले.



पोसरी येथील शिवतीर्थ कार्यालयात पेण अर्बन बँक संघर्ष समितीचे सदस्य व ठेवीदार यांनी आमदार थोरवे यांची भेट घेतली. समितीचे सचिव चिंतामणी पाटील, सदस्य प्रदीप शहा, मोहन सुर्वे यांनी बँकेच्या सद्यस्थितीची माहिती दिली. बँक बंद होऊन १२ वर्ष झाली तरी ठोस निर्णय नाही. सुमारे दोन लाख ठेवीदारांना न्याय मिळवून द्यावा. बँकेचा आर्थिक घोटाळा ७५३ कोटी रुपयांचा आहे. बँकेची मिळकत जमीन सुमारे दोन हजार कोटी रुपयांची आहे. सरकारने सर्व मिळकत ताब्यात घेतली असून पुढील कार्यवाही होत नाही. आत्तापर्यंत ५५४ ठेवीदार मरण पावले आहेत. आम्हाला याबाबतीत मुख्यमंत्र्यांची भेट घेण्यासाठी आपण पुढाकार घ्यावा, अशी विनंती प्रदीप शहा व मोहन सुर्वे यांनी आमदार थोरवे यांना केली.

दिवाळीनंतर लगेचच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बरोबर ही समस्या तसेच रिलायन्स कंपनीने शेतकऱ्यांना योग्य मोबदला दिला नाही या दोन विषयांवर बैठक आयोजित करण्यात येईल, असा शब्द दिला. धनंजय देशमुख, श्रीकांत दिवेकर, दिपक साळ्वे, शांतीलाल रावळ, कर्जतचे नगरसेवक संकेत भासे, शिंदे गटाचे तालुका प्रमुख संभाजी जगताप, अभिषेक सुर्वे आदींसह ठेवीदार उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना भातपिकाची नुकसानभरपाई द्यावी

## पंकज तांबेंची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**माणगाव : प्रतिनिधी**

परतीच्या पावसामुळे रायगड जिल्ह्यातील भातपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून त्यामुळे शेतकरी पुरता उद्ध्वस्त झाला आहे. नुकसान झालेल्या शेतीचे पंचनामे तात्काळ करून बाधीत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते पंकज तांबे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदनाद्वारे केली आहे.

गोरगरीब कष्टकरी-शेतकरी यांचे मायबाप अशी शिंदे-फडणवीस सरकारची ओळख आहे. सध्या परतीच्या पावसाने माणगाव तालुक्यातील भातपिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्याचे तत्काळ पंचनामे करून बाधीत शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी, व शेतकऱ्यांची दिवाळी गोड करावी, असे तांबे यांनी निवेदनात म्हटले आहे.

दरम्यान, अतिवृष्टीग्रस्तांना मदत देण्याचा निर्णय राज्य सरकारने यापूर्वीच घेतला आहे. परतीच्या पावसामुळे नुकसान झालेल्या शेतीचे जिल्हा प्रशासनाने युद्धपातळीवर पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत देण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

# पतसंस्थांनी सीआरएआरचा अभ्यास करावा -डॉ. सोपान शिंदे



**अलिबाग : प्रतिनिधी**

भविष्यात येणारे संभाव्य धोके टाळण्यासाठी भांडवल पर्याप्त प्रमाण (सीआरएआर) या विषयाचा पतसंस्थांनी अभ्यास करावा, असे आवाहन रायगडचे सहकारी संस्था उपनिबंधक डॉ. सोपान शिंदे यांनी बुधवारी (दि. १९) अलिबाग येथे केले.

सहकारी संस्था उपनिबंधक कार्यालय आणि कमळ नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सीआरएआर या विषयावर बुधवारी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभागृहात प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन रायगडचे सहकारी संस्था उपनिबंधक डॉ. सोपान शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. सीआरएआर या विषयावर विनामूल्य प्रशिक्षण शिबिर आयोजित केल्याबद्दल डॉ. सोपान शिंदे यांनी कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचे कौतुक केले.

कमळ पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष गिरीश तुळपुळे यांनी पाहुण्याचे स्वागत केले. प्रमुख व्याख्याते जिल्हा उपनिबंधक गणेश निमकर यांनी सीआरएआर या विषयावर मार्गदर्शन केले. रायगड जिल्ह्यातील ४७ पतसंस्थांचे १०७ प्रतिनिधी या प्रशिक्षण शिबिरात सहभागी झाले होते. कमळ पतसंस्थेचे अध्यक्ष सतीश पाटील यांनी आभार मानले.

# आयुर्वेदिक सुगंधी उटणे आणि साबण बनविण्याचे विद्यार्थ्यांना धडे

**कर्जत : प्रतिनिधी**

माजी आमदार स्व. तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान आणि ज्योविस आयुर्वेदा दादर- मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आणि नारी सामाजिक संस्थेच्या सहकार्याने कडाव येथील हुतात्मा हिराजी पाटील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आयुर्वेदिक सुगंधी उटणे व साबण तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी अचूक उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. नारी सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष डॉ. ज्योती सातपुते यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. शिक्षिका वैष्णवी ठोंबरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर डॉ. सातपुते यांनी आयुर्वेदाचे महत्त्व सांगून, बाजारात मिळणाऱ्या उटणे व साबणापेक्षा आपण आयुर्वेदिक वनौषधी टाकून तयार केलेले उटणे व साबण शरीराला कोणताही अपाय करीत नाही, उलट आपली कांती अधिक चांगली होते, असे स्पष्ट केले. या वेळी त्यांनी सुगंधी आयुर्वेदिक उटणे व साबण बनविण्याचे प्रात्यक्षिक दाखविले. यानंतर विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाबाबत प्रश्न विचारण्यात आले. बरोबर उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना आयुर्वेदिक साबण बक्षीस देण्यात आले तसेच सर्व विद्यार्थ्यांना व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून तयार केलेले उटणे देण्यात आले. या वेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश सुर्वे यांनी मनोगत केले. योगिता जाधव यांनी सूत्रसंचालन केले. प्रतिष्ठानच्या सचिव मनीषा सुर्वे, तिरुपती बालाजी मंडळाचे तानाजी पाटील, अशोक भोईर, आदिती शिंदे सपना बेलेकर, आशा जाधव, श्याम शेळके, नंदकुमार माळी यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सतीश मराडे यांनी आभार मानले.




# अलिबागेत शहीद पोलीस जवानांना रायगड पोलिसांची मानवंदना

**अलिबाग : प्रतिनिधी**

पोलीस हुतात्मादिनानिमित्त रायगड पोलीस दलातर्फे शुक्रवारी (दि. २१) अलिबाग येथील पोलीस मुख्यालय कवायत मैदानात हुतात्मा पोलीस जवानांना मानवंदना देण्यात आली.

लडाखमधील भारताच्या सीमेवर बर्फाच्छादित व निर्जन अशा हॉटस्प्रिंग या ठिकाणी २१ ऑक्टोबर १९५९ रोजी गस्त घालणाऱ्या पोलीस दलातील जवानांवर चिनी सैनिकांनी अचानक हल्ला केला. त्यात १० पोलीस जवानांना विरगतीला प्राप्त झाली. या वीर जवानांनी दाखविलेल्या अतुलनीय शौर्यापासून इतरांना स्फूर्ती मिळावी तसेच कर्तव्याची व राष्ट्रनिष्ठेची जाणीव व्हावी, म्हणून शहीद जवानांच्या स्मृतीप्रीत्यर्थ दरवर्षी २१ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण भारतभर पोलीस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो.



पोलीस हुतात्मा दिनानिमित्त शुक्रवारी अलिबाग येथील रायगड पोलीस मुख्यालय कवायत मैदान येथे पोलीस स्मृतिदिन कार्यक्रम आजोजित करण्यात आला होता. रायगडचे अतिरिक्त जिल्हा सत्रन्यायाधीश अशोक भिलारे यांच्या उपस्थितीत मैदानावरील पोलीस शहीद स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून सलामी देण्यात आली. आमदार भरत गोगावले, रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, सेवा प्राधिकरणाचे सचिव अमोल शिंदे, जिल्हा शासकीय अभियोक्ता भूषण साळवी, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, पोलीस उपअधीक्षक (गृह) जगदीश काकडे यांच्यासह पोलीस अधिकारी, कर्मचारी, मंत्रालयीन कर्मचारी या वेळी उपस्थित होते.

पोलीस निरीक्षक नितीन गवारे व सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेश जाधव यांनी वीरगती प्राप्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे वाचली. पोलीस हवालदार दिनेश बिर्जे व प्रतीम सुतार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.


**पनवेल महानगरपालिका**
**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | श्री. महेश रमेश पाटील, प्लॉट नं.२५-२६, सेक्टर-५अ, नवीन पनवेल | ०३ जंगली झाडे तोडणी करणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं.२५-२६, सेक्टर-५अ, नवीन पनवेल येथील भूखंडाच्या आवारात नवीन बांधकाम करणेस व प्लॉटमध्ये वाहनांना ये-जा करण्यास अडथळा करीत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सूचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**जा.क्र. पमपा/उद्यान/२१२२/प्र.क्र. ८८/६१२/२०२२**
**दिनांक :-२१ /१०/२०२२**

**सही/-**
**उप आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**


## पान ३ वरून

पान ३ वरून

### शेतकऱ्यांसाठी वचनपूर्ती आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून शिंदे-फडणवीस सरकारचे अभिनंदन!

अखेर गुरुवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पक्ष व बाळासाहेबांची शिवसेना युती सरकारने याची अंमलबजावणी सुरू केली व सहा लाख ९० हजार शेतकऱ्यांच्या खात्यात अडीच हजार कोटी रुपये सरकारने जमा केले. शिंदे-फडणवीस सरकारने पहिल्याच बैठकीत नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णय घेतला होता. पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा होण्यासाठी या वेळेस पहिल्यांदाच एका क्लिकवर निधी जमा करण्यात आला आहे. दिवाळीपूर्वी ही रक्कम जमा झाल्याने शेतकऱ्यांची दिवाळी गोड होणार आहे.

परतीच्या पावसामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या बाबतीत जिल्हा प्रशासनाने नुकसान झालेल्या भागाचे पंचनामे युद्धपातळीवर करून शेतकऱ्यांना मदत द्यावी, असाही आदेश सरकारने दिला आहे. शिंदे-फडणवीस सरकार सातत्याने संकटग्रस्त शेतकऱ्यांना तत्परतेने मदत करीत आहे. याशिवाय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महाराष्ट्र ग्रीबिझनेस नेटवर्क संस्थेस अनुदान स्वरूपात निधी देण्याचा निर्णय झाला. यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे शक्य होणार आहे तसेच नाशवंत शेतीमालाचे काढणीपश्चात नुकसान कमी होणार आहे. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चांगले दर मिळण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे. या निर्णयाबद्दलही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सरकारचे अभिनंदन केले.


**जाहीर नोटीस**

सर्व लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यास येते की, **श्री गणेशकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित,** चे सभासद श्रीमती स्नेहलता प.सोनार हे संस्थेचे सभासद म्हणून सदनिका क्र. १ धारण करत होते. त्याचे अनुषंगाने त्यांना भागदाखला क्र. ३२ द्वारे भाग क्र. १५६ ते १६० वितरीत करण्यात आलेले आहे. सदरहू सभासद मयत झाली असून, त्यांनी मृत्युपूर्वी त्यांचे अखेरचे मृत्यूपत्र करून सदरची सदनिका व संस्थेचे भाग भांडवल संस्थेच्या दप्तरी श्री हेमंत प.सोनार यांचे नावे नोंदविण्याची व्यवस्था केलेली आहे.

श्री. हेमंत प.सोनार यांनी सदरहू मृत्यूपत्राच्या अनुषंगाने पुढील कारवाई होण्याकरीता दि. ६/१०/२०२२ रोजीचा अर्ज व सोबत मृत्यूपत्राची प्रत संस्थेकडे दाखल केलेली आहे. त्याअनुषंगाने पढील कारवाई संस्था करणार आहे. परंतू तत्पुर्वी सदरहू सदनिका, तिचे भाग भांडवल अगर मयताचे मृत्यूपत्राबाबत कोणाचाही वाद अगर, हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांमध्ये योग्य त्या कागदोपत्री हरकती सह आपल्या लेखी हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीमध्ये कुणाचीही हरकत आली नाही, तरी याकामी संस्था नियमांप्रमाणे पढील कारवाई करतील याची सर्व सामान्यांनी नोंद घ्यावी.

**पनवेल,**
**दि. - २१/१०/२०२२**

सही/-
**सचिव**
**श्री. गणेश कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था**
**तात्पुरता पत्ता ए-३६, प्रिन्स पॅराडाईज**
**सहकारी गृहनिर्माण संस्था, स्वामी समर्थ मार्ग,**
**पनवेल ४१० २०६, जि. रायगड.**
**भ्रमणध्वनी क्र. ९३२२२१२३२८**

**जाहीर नोटीस**

सर्व लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यास येते की, **श्री गणेशकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित,** चे सभासद श्रीमती विनता धोंडू सावंत हे संस्थेचे सभासद म्हणून सदनिका क्र. ७ धारण करत होते. त्याचे अनुषंगाने त्यांना भागदाखला क्र. ७ द्वारे भाग क्र. ३१ ते ३५ वितरीत करण्यात आलेले आहे. सदरहू सभासद मयत झाली असून, त्यांनी मृत्युपूर्वी त्यांचे अखेरचे मृत्यूपत्र करून सदरची सदनिका व संस्थेचे भाग भांडवल संस्थेच्या दप्तरी श्री केशव धोंडू सावंत यांचे नावे नोंदविण्याची व्यवस्था केलेली आहे.

श्री. केशव धोंडू सावंत यांनी सदरहू मृत्यूपत्राच्या अनुषंगाने पुढील कारवाई होण्याकरीता दि. १२/२०/२०१२ रोजीचा अर्ज व सोबत मृत्यूपत्राची प्रत संस्थेकडे दाखल केलेली आहे. त्याअनुषंगाने पुढील कारवाई संस्था करणार आहे. परंतू तत्पुर्वी सदरहू सदनिका, तिचे भाग भांडवल अगर मयताचे मृत्यूपत्राबाबत कोणाचाही वाद अगर, हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांमध्ये योग्य त्या कागदोपत्री हरकती सह आपल्या लेखी हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीमध्ये कुणाचीही हरकत आली नाही, तरी याकामी संस्था नियमांप्रमाणे पुढील कारवाई करतील याची सर्व सामान्यांनी नोंद घ्यावी.

**पनवेल,**
**दि. - २१/१०/२०२२**

सही/-
**सचिव**
**श्री. गणेश कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था**
**तात्पुरता पत्ता ए-३६, प्रिन्स पॅराडाईज**
**सहकारी गृहनिर्माण संस्था, स्वामी समर्थ मार्ग,**
**पनवेल ४१० २०६, जि. रायगड.**
**भ्रमणध्वनी क्र. ९३२२२१२३२८**

## निवडक

### झोपलेल्या व्यक्तीवर अज्ञाताचा हल्ला

**पनवेल :** दारूच्या नशेत झोपेत असलेल्या माणसावर अज्ञात व्यक्तीने हल्ला करून त्याला जखमी केल्याची घटना पळस्पे ब्रिज परिसरात घडली आहे. स्वप्निल सहस्त्रबुद्धे (वय २८) हे पळस्पे ब्रिज खाली दारूच्या नशेत झोपले होते. कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात शस्त्रांच्या सहाय्याने त्यांच्या हातावर व पायावर मारून त्याला जखमी केले. याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### बसमधील डिझेलची चोरी

**पनवेल :** तालुक्यातील पाडेघर गाव परिसरात बसचा टायर फुटल्याने बस उभी ठेवली होती. या वेळी अज्ञात चोरट्याने बसमधील डिझेलची चोरी केल्याची घटना घडली आहे. बसचालक प्रमोद धावारे याने त्याच्या ताब्यातील बसचा टायर फुटल्याने बस पाडेघर गाव परिसरात उभी ठेवली होती. याचवेळी अज्ञात चोरट्याने बसच्या डिझेल भरण्याच्या टाकीचे लॉक तोडून आतील २०० लिटर डिझेल (किंमत जवळपास १८ हजार रुपये) चोरून नेले. याबाबतची पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### अजिता कुमठेकर सचिवपदी



**पनवेल :** सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या मानवता फाउंडेशनच्या राष्ट्रीय सचिवपदी सामाजिक कार्यकर्त्या अजिता कुमठेकर यांची नियुक्ती अध्यक्ष संजय पवार यांनी नियुक्ती पत्र देऊन केली आहे. मानवीय मूल्यांचे रक्षण करून सामाजिक कार्यात अग्रेसर संघटना असलेल्या मानवता फाउंडेशनच्या राष्ट्रीय सचिव पदी सामाजिक कार्यकर्त्या अजिता कुमठेकर यांची नियुक्ती करण्यात आली. या वेळी अध्यक्ष संजय पवार, महिला अध्यक्षा स्वाती पांचाल आदी उपस्थित होत्या.

### ट्रान्स्फॉर्मरमधून वायर, ऑइलची चोरी

**पनवेल :** शहरातील साईनगर रोड परिसरात असलेल्या एका ट्रान्स्फॉर्मरमधून कॉपर वायरिंग व ऑइलची चोरी अज्ञात चोरट्याने केल्याची घटना घडली आहे. साईनगर रोड परिसरात असलेल्या एका ट्रान्स्फॉर्मरमधून कॉपर वायंडिंग व ऑइलची चोरी (किंमत जवळपास तीन लाख १० हजार रुपये) केली. याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### खाऊ व शैक्षणिक साहित्याचे वाटप



**उरण :** सामाजिक कार्यकर्ते सुप्रिया गायकवाड यांचे पुत्र युवान गायकवाड यांनी सामाजिक बांधिलकी जपत रानसई प्राथमिक शाळेतील आदिवासी शालेय विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप तसेच टिफिन बॅग्स व सोबतच शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. या वेळी सुप्रिया गायकवाड, प्रियंका शिंगटे, निर्मला आळेकर, रायगड भूषण राजू मुंबईकर, प्रभू, अश्विन, रानसई प्राथमिक शाळेचे शिक्षिका कडू मॅडम आदी उपस्थित होते.

### ॲब्युलन्समधून डिझेल चोरले

**पनवेल :** उपजिल्हा रुग्णालयाच्या परिसरात उभी करून ठेवलेल्या ॲब्युलन्समधून अज्ञात चोरट्याने १०० लिटर डिझेलची चोरी केल्याची घटना शहरात घडली आहे. शहरातील उपजिल्हा रुग्णालयाच्या परिसरात उभी करून ठेवलेल्या ॲब्युलन्समधून अज्ञाताने १०० लिटर डिझेल (किंमत नऊ हजार रुपये) चोरले. याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# चिरनेर परिसरात भटक्या कुत्र्यांमध्ये वाढ

## ■ गावात दुर्गंधीचे वातावरण
## ■ रोगराई पसरण्याची भीती



**उरण : वार्ताहर**

चिरनेर गावासह चिरनेर परिसरात भटक्या कुत्र्यांची संख्या वाढत चालली असून, त्यांचे चावण्याचे प्रमाण वाढले आहे. ही भटकी कुत्री परिसरात जागोजागी करीत असलेल्या विष्ठेमुळे, चिरनेर गावात दुर्गंधीचे वातावरण पसरले आहे. सध्या पडत असलेल्या पावसामुळे या दुर्गंधीची परिस्थिती बिकट बनत चालली आहे.

भटकी कुत्री एकमेकांना चावून, जखमी होणाऱ्या कुत्र्यांचीही संख्या वाढत आहे. त्यामुळे गावात रोगराई पसरण्याची भीती दिसत आहे. परिसरात मटन, चिकन विकणाऱ्या व्यापाऱ्यांची संख्या मोठी आहे. व्यापारी कापत असलेल्या कोंबड्या बकऱ्यांची आतडी उघड्यावर टाकत असल्यामुळे ही भटकी कुत्री त्याच्यावर ताव मारीत आहेत. त्यामुळे परिसरातील मानवी वस्त्यांमध्ये या भटक्या कुत्र्यांनी दहशत माजवली आहे.

दरम्यान, सकाळी शाळेत तर सायंकाळी ट्युशनला जाणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये, कळपाने फिरणाऱ्या या कुत्र्यांची, दहशत निर्माण झाली असून बाहेर पडताना या मुलांना धडकी भरते. चिरनेर श्री महागणपतीच्या मंदिर परिसरातील, भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून, ही भटकी कुत्री मंदिर परिसरात विष्ठेची घाण करीत असल्यामुळे श्री महागणपतीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तगणांमधून नाराजीचा सूर उमटत आहे.

याशिवाय टोलक्याने दबा धरून बसलेली ही कुत्री रस्त्यावरून चालणाऱ्या पादचारी नागरिकांच्या हातात असलेली, मटण मच्छीची पिशवी हातातून ओडबडून पळ काढीत आहेत. तर दुचाकीस्वाराला गाठून त्याच्यावरही हल्ला चढवीत आहेत. कुत्री करीत असलेल्या विष्ठेच्या घाणीच्या दुर्गंधीमुळेही येथील नागरिक व महिलावर्ग वैतागला आहे.

**बंदोबस्त करण्याची मागणी**

**भटक्या कुत्र्यांनी चावा घेण्याचे प्रकार सर्रास सर्वत्र घडत आहेत. कुत्र्याने चावा घेतल्यामुळे रेबीज नावाचा जीवघेणा रोग जडण्याची शक्यता असते. या घटनेची दखल घेऊन संबंधित प्रशासनाने ॲन्टी रेबीज लसीकरणाची मोहीम राबवावी, अशी मागणी स्थानिक नागरिक करीत आहेत.**

## पेठाली येथे बसथांब्याचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील पेठाली येथे कै. प्रभाकर राजाराम केणी यांच्या स्मरणार्थ बसथांबा सुरू करण्यात आला आहे. भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी आणि त्यांच्या कुटूंबीयांच्या माध्यमातून हा बसथांबा सुरू करण्यात आला आहे. या थांब्याचे उद्घाटन नामदेव केणी यांच्या हस्ते आणि भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

या वेळी पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक हरेश केणी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे बबन पाटील, एकनाथ म्हात्रे, नामदेव केणी, दिनेश केणी, बाळाराम मुंबईकर, राजाराम केणी, निर्दोष केणी, नितीन केणी, जगदिश घरत, प्रेमा आपाचा, जयवंत घरत, दिलीप केणी आदी उपस्थित होते.




(छाया : संकेत भोईर)

## पनवेलमध्ये दिवाळी फराळ कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनकल्याण समिती व जनहित संवर्धक मंडळाच्या वतीने पनवेलमधील शिवाजी नगर वसाहत येथे दिवाळी फराळ कार्यक्रम गुरुवारी (दि. २०) आयोजित करण्यात आला होता. या वेळी वसाहतीतील नागरिक उपस्थित होते.

जनकल्याण समितीचे कार्यकर्ते, पटवर्धन रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका, रुग्णवाहिका चालक व रा. स्व. संघ कोकण प्रांत यांच्यासह सेवा प्रमुख शिरीष देशमुख कार्यक्रमाला उपस्थित होते. उपस्थितांनी गप्पा मारत फराळाचा आस्वाद घेतला. संपूर्ण वस्ती दर्शन घेतले. या कार्यक्रमासाठी भाजप झोपडपट्टी सेल उत्तर रायगड जिल्हा संयोजक राहुल वाहुळकर, अनुसूचित जाती मोर्चा तालुका उपाध्यक्ष रावसाहेब खरात, युवा कार्यकर्ते आनंद जाधव, राम खवले, राजू झिरे, गोरख खवले, आनंद वाहुळकर आदींचे सहकार्य लाभले.

दरम्यान, दर गुरुवारी सायंकाळी पटवर्धन रुग्णालयातर्फे वस्तीत आरोग्य तपासणी होते. याचा ३० ते ३५ लाभ घेतात.





## उभी असलेली रिक्षा जळून खाक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शहरातील उरण नाका येथील यश हास्पिटलजवळ शुक्रवारी (दि. २१) दुपारी १.३०च्या सुमारास एका रिक्षेला आग लागली. यामध्ये रिक्षा पूर्ण जळून खाक झाली असून काही काळ वाहतूक कोंडी झाली होती.

रिक्षाचालक दीपक चिंतुइंद्रे (रा. परहूर, अलिबाग) यांनी पनवेलमधील उरण नाका येथील यश हॉस्पिटलजवळ आपली रिक्षा उभी केली होती. या रिक्षेने अचानक पेट घेतला. अग्निशमन दलाने ही आग आटोक्यात आणली. दरम्यान, काही काळ वाहतूक कोंडी झाली होती.

## दिवाळी शुभेच्छा!



**पनवेल : प्रकाशाचा सण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दिवाळीनिमित्त ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे तसेच विजय उन्नी यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेत शुभेच्छा दिल्या. त्यांच्यासमवेत अन्य मान्यवर उपस्थित होते.**



(छाया : चेतन पोपेटा)





**पनवेल : रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक संचालक मंडळाच्या निवडणुकीत रायगड वाशी कार्यक्षेत्रातून विजयी झाल्याबद्दल प्रा. किशोर पाटील यांचे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले तसेच 'रयत'च्या रायगड विभागीय कार्यालयाचे अधिकारी रोहिदास ठाकूर यांनीही प्रा. किशोर पाटील यांचे अभिनंदन केले. या वेळी माजी व्हाईस चेअरमन नुरा शेख, संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य आणि रयत को-ऑपरेटिव्ह बँकेचे माजी व्हाईस चेअरमन प्रमोद कोळी, संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य रवींद्र भोईर, उपशिक्षक महेश पाटील, सुनील चिखले, सागरकुमार रंधवे उपस्थित होते.**



**पनवेल : प्रसिद्ध यु ट्युबर विनायक माळी यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची शुक्रवारी भेट दिली. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे स्वागत केले. या वेळी भाजपचे युवा नेते विश्वजीत पाटील, अपूर्व ठाकूर उपस्थित होते.**

## संदीप तुपे यांचे भाजपमधून निलंबन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पक्षाची बदनामी होईल, असे वर्तन करत असल्याबद्दल कामोठे येथील शक्ती केंद्र प्रमुख संदीप तुपे यांचे भारतीय जनता पक्षातून सहा वर्षांकरिता निलंबन करण्यात आले आहे.

संदीप तुपे हे आपल्या वर्तनातून पक्षाची प्रतिमा मलिन करण्याचे काम करीत असल्याच्या तक्रारी वारंवार पक्षाकडे येत आहेत, त्या अनुषंगाने या संदर्भात वारंवार समज दिली तसेच त्याबतचे लेखी पत्रही तुपे यांना जिल्हा भाजपच्या वतीने देण्यात आले होते. तरीसुद्धा संदीप तुपे यांच्या वर्तनात बदल झाला नाही, उलट तक्रारीमध्ये अधिक वाढ होत चालली असल्याने अखेर पक्षाची बदनामी थांबवण्याकरिता संदीप तुपे यांचे भारतीय जनता पक्षातून सहा वर्षांकरिता निलंबन करण्यात आले आहे.

## चिर्लेतील महिला बचत गटांना दिवाळी फराळ साहित्याची भेट

**एकविरा माऊली महिला मंडळाचा उपक्रम**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चिर्ले गावातील एकविरा माऊली महिला मंडळाच्यावतीने गावातील १५ महिला बचत गटातील महिलांना दिवाळी फराळाला लागणाऱ्या साहित्यांची भेट देण्यात आली. हा उपक्रम मंडळाच्या अध्यक्षा वर्षा प्रेमकुमार घरत यांनी त्यांच्या स्वखर्चातून केला असून या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.



चिर्ले गावात एकविरा माऊली महिला मंडळाची वर्षा घरत यांच्या नेतृत्वाखाली स्थापना करण्यात आली आहे. दीपावलीनिमित्त या मंडळाच्यावतीने गावातील महिला मंडळ बचत गट, जय भवानी महिला बचत गट, श्री खंडोबा प्रसन्न गट, दुर्गामाता बचत गट, जय मल्हार बचत गट, नवशक्ती बचत गट, संजीवनी बचत गट, सिद्धिविनायक महिला मंडळ, मंगला गौरी महिला बचत गट, वरद विनायक महिला मंडळ, हिरकणी बचत गट, मंगला गौरी बचत गट, राधाकृष्ण बचत गट, वैभवलक्ष्मी बचत गट, समर्थ कृपा बचत गट या सक्रिय महिला बचत गटातील ३०० महिलांना रवा, मैदा, साखर, डालडा, पोहा, खोबरा व उटणे या साहित्याची भेट देऊन दीपावलीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

वाचाल तर वाचाल!
जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

वाचाल तर वाचाल हे नवे सदर दर महिन्याच्या पहिल्या आणि चौथ्या रविवारी 'दैनिक राम प्रहर'च्या अंकात वाचा. या सदरात वाचा निवडक साहित्यिकांनी वाचलेल्या पुस्तकांविषयीचे रसग्रहण.

येत्या रविवारी, २३ ऑक्टोबर २०२२ रोजी वाचूया त्रिदिव, कर्जत येथील अनुपमा कुळकर्णी (सध्या वास्तव्य अमेरिका) यांच्या आवडत्या पुस्तकांविषयी त्यांच्याच लेखातून.

# वावडुंगी ग्रामपंचायतीला होणार पाणीपुरवठा

## आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नातून योजना -सरपंच भेकरे

**मुरुड : प्रतिनिधी**

जलजीवन मिशन योजनेअंतर्गत मुरुड तालुक्य ातील वावडुंगी ग्रामपंचायतीकरिता आमदार महेंद्र दळवी यांच्या विशेष प्रयत्नाने ५६ लाख ८१ हजार रुपयांची नळ पाणीपुरवठा योजना मंजूर झाली असल्याची माहिती सरपंच हरिश्चन्द्र भेकरे व उपसरपंच दीपेश वरणकर यांनी पत्रकारांना दिली.



वावडुंगी ग्रुपग्रामपंचायतीमध्ये वावडुंगी, सायगाव, वरचीवाडी, आदिवासीवाडी, महालोर आदी गावांचा समावेश होतो. तेथील लोकसंख्या सुमारे तीन ते साडेतीन हजार आहे. दरवर्षी उन्हाळ्यात वावडुंगी व सायगाव या गावांना भीषण पाणीटंचाईस सामोरे जावे लागत होते. सायगाव बौद्ध समाज अध्यक्ष मंगेश मोरे, मुंबईकर ग्रामस्थ विकास मोरे, सचिव नथुराम भेकरे, खजिनदार सुरेश भुवड, ग्रामस्थ नरेश उदेक, प्रदीप वाझे, संदीप महाडिक, रियाज इंद्रूस शबाब जमादार यांच्यासह आम्ही आमदार दळवी यांची भेट घेऊन त्यांना वावडुंगी व सायगाव येथील पाणीटंचाई दूर करण्याचे साकडे घातले होते. आमदारांनी वावडुंगी ग्रुपग्रामपंचायतीची पाणीपुरवठा योजना तातडीने मंजूर करण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांना पत्र देऊन सदरची योजना मंजूर करून घेतली. त्यामुळे वावडुंगी ग्रामपंचायतीमधील ग्रामस्थ आमदार दळवी यांचे सदैव ऋणी राहतील, असे सरपंच भेकरे व उपसरपंच वरणकर यांनी सांगितले.

वावडुंगी ग्रुपग्रामपंचायतीला सवतकडा धरणातून पाणीपुरवठा होणार आहे. प्रत्येक घराला नळ दिला जाणार आहे. आमदार महेंद्र दळवी यांनी त्यांच्या निवासस्थानी वावडुंगी ग्रामस्थांना या पाणीपुरवठा योजनेचा कार्यारंभ आदेश प्रत दिली असून लवकरच या योजनेचे काम सुरु होणार असल्याची माहिती सरपंच हरिश्चन्द्र भेकरे व उपसरपंच दीपेश वरणकर यांनी पत्रकारांना दिली.

# खालापुरात शासनाच्या आनंदाचा शिधाचे वाटप



**खोपोली : प्रतिनिधी**

राज्य सरकारने घोषणा केलेला आनंदाचा शिधा शुक्रवारी (दि. २१) खालापुरात पोहचला असून आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते त्याचे वाटप करण्यात आले.

गरिबांची दिवाळी आनंदाची होण्यासाठी रेशन दुकानात अवघ्या शंभर रुपयात आनंदाचा शिधा शासनाकडून मिळणार आहे. चणाडाळ, रवा आणि साखर (प्रत्येकी एक किलो) असे शिधाजिन्नस शुक्रवारी संच खालापुरात पोहचले.

आनंदाचा शिधा वितरण कार्यक्रमास आमदार महेंद्र थोरवे, खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी, नायब तहसीलदार राजश्री जोगी, पुरवठा निरिक्षक सतीश शिंदे, अव्वल कारकून स्नेहा पवार, पुरवठा विभागाचे रत्नाकर बेहरे, रविकांत वागपंजे, प्रतीक्षा दिघे, प्राजक्त चौधरी यांच्यासह तालुक्यातील रेशन दुकानदार आणि प्रातिनिधिक स्वरूपात लाभार्थी उपस्थित होते. या वेळी तहसील कार्यालयाच्या आवारात बचतगटातर्फे लावण्यात आलेल्या विविध स्टॉलची आमदार थोरवे यांनी पाहणी केली.

# तहसील कार्यालय परिसरात स्वच्छता अभियान

## माणगावच्या टीएमसी कॉलेजचा उपक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीच्या माणगाव येथील टिकमभाई मेथा कॉमर्स (टीएमसी) कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी बुधवारी (दि. १९) तहसील कार्यालय परिसरात स्वच्छता अभियान राबवले. या वेळी स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी तहसील कार्यालय परिसरातील प्लास्टिक बाटल्या, पिशव्या त्याचप्रमाणे प्लास्टिकच्या विविध वस्तू गोळा करण्याचे काम केले. त्यानंतर नगरपंचायतीच्या कचरा गाडीमध्ये हा कचरा टाकून त्याची विल्हेवाट लावण्यात आली. सुरुवातीला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य हर्षल जोशी यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छता अभियानाविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी तहसील कार्यालय परिसरामध्ये सुमारे दोन ते अडीच तास श्रमदान करून संपूर्ण परिसराची साफसफाई केली. या वेळी तीन ते चार किलोपेक्षा अधिक प्लास्टिक, वेस्टेज आणि इतर कचरा गोळा करण्यात आला. निवासी नायब तहसीलदार बी. वाय. भाबड यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले. महाविद्यालयाचे एनएसएस प्रोग्राम ऑफिसर प्रा. डॉ. चंद्रकांत माळी यांनी या स्वच्छता अभियानाचे नियोजन करून विद्यार्थ्यांसोबत सहभाग घेतला.




# काशिद, बारशीवमध्ये आढळले गोवंशीय जनावरांच्या मांसाचे तुकडे

## रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**रेवदंडा, मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील काशिद पुलाखाली सेच बारशीव येथील कोळंबी प्रकल्पाच्या मागील बाजूस गोवंशीय जनावरांच्या मासांचे तुकडे आढळल्याने परिसरात खळबळ उडाली. या प्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात अज्ञाताच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अज्ञात इसमाने गोवंशीय जनावरांची बेकायदेशीरीत्या हत्या करून त्यांच्या मांसाचे तुकडे बारशीव येथील कोळंबी प्रकल्पाच्या मागे व काशिद पुलाचे खाली टाकले असल्याची माहिती मुरुड व रेवदंडा पोलिसांना मिळतात, त्यांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली. रेवदंडा पोलीस ठाण्याच्या सहाय्यक निरिक्षक क्रांती पाटील यांनी बारशीव कोळंबी प्रकल्पामागे प्रत्यक्ष पहाणी केली. सहाय्यक फौजदार रमण महाले यांनी या प्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात अज्ञाताच्या विरोधात फिर्याद दाखल केली असून अधिक तपास हवालदार संजय ठाकूर करत आहेत.

# धान व भरडधान्य खरेदीकरिता शेतकरी नोंदणीस मुदतवाढ

## ऑनलाईन पोर्टलवर सुविधा उपलब्ध

**अलिबाग : जिमाका**

खरीप पणन हंगाम २०२२-२३मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान व भरडधान्य खरेदीकरिता ऑनलाईन पोर्टलवर शेतकरी नोंदणीकरिता १० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

धान व भरडधान्य खरेदीकरिता ऑनलाईन पोर्टलवर शेतकरी नोंदणीकरिता यापूर्वी २१ ऑक्टोबर अखेरपर्यंत मुदत देण्यात आली होती, मात्र मागील हंगामांचा विचार करता या मुदतीत शेतकरी नोंदणी पूर्ण झाली नसल्याचे दिसते. त्याचा विचार करून पणन हंगाम २०२२-२३मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान व भरडधान्य खरेदीकरिता ऑनलाईन पोर्टलवर शेतकरी नोंदणीकरिता १० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. याची नोंद घेऊन जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी चालू वर्षाचा सातबारा, चालू बँक खाते व स्पष्ट दिसणारे आधारकार्ड यासह खरेदी केंद्रावर स्वतः जाऊन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके व जिल्हा पणन अधिकारी केशव ताटे यांनी केले आहे.

# प्रकल्पग्रस्त तरुण ते यशस्वी उद्योजक सूरदास दामाजी गोवारी यांचा प्रेरणादायी प्रवास


**शिक्षण, हॉटेल तसेच शिपिंग व्यवसायात सूरदास गोवारी यांनी आजमावलेले नशीब यशस्वी ठरले आहे. २०१८ साली डी. एम. शीप रिपेअर्स प्रायव्हेट लिमिटेड नावाची कंपनी स्थापन केली. शिपिंग क्षेत्राशी निगडित या व्यवसायात मोठमोठ्या नौकांच्या दुरुस्तीचे काम डी. एम. शीप रिपेअर्स प्रायव्हेट लिमिटेड नावाची कंपनी करते. भारतासह इग्लंड, सिंगापूर, इस्त्रायल, व्हिएतनाम, श्रीलंका, मलेशिया यासारख्या देशातील ख्यातनाम बोटींची दुरुस्ती सूरदास गोवारी यांची शिपिंग कंपनी करते.**

१९७० साली नवी मुंबईत सिडको महामंडळ आले. याकरिता ९५ गावांच्या जमिनी संपादित झाल्या. हजारो हेक्टर जमिनी संपादित झाल्याने स्थानिक शेतकऱ्यांचा पारंपरिक शेती व्यवसाय नष्ट झाला. या वेळी शेतकऱ्यांच्या पुढील पिढीसमोर असंख्य प्रश्न उभे राहिले. शिक्षण, नोकरी, व्यवसाय असे हे प्रश्न होते. या परिस्थितीत अनेकांनी हलाकीचे जीवन जगत संघर्ष करीत आपली ओळख निर्माण केली. यापैकीच एक असलेले कामोठे गावातील यशस्वी उद्योजक, शिक्षणमहर्षी सूरदास दामाजी गोवारी हे एक आहेत. सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेले सूरदास गोवारी हे यशस्वी उद्योजक आहेतच याव्यतिरिक्त कामोठेसारख्या शहरात सूरदास गोवारी यांनी आपली हभप गणपत राघो गोवारी शैक्षणिक व सामाजिक शिक्षण संस्था स्थापन करून भविष्यातील पिढी घडविण्याचे काम ते करीत आहेत.

सूरदास गोवारी यांचे शिक्षण बारावीपर्यंत झाले आहे, मात्र त्यांची दूरदृष्टी वाखाणण्याजोगी आहे. कामोठे वसाहतीचा वाढता विस्तार लक्षात घेता गोवारी यांनी २००९ साली शिक्षण क्षेत्रात आपले योगदान देण्याचा निश्चय केला. गरीब कुटूंबातून आल्याने गरजू व गरीब मुलांना कमी पैशात दर्जेदार शिक्षण देण्याचा विचार करीत हभप गणपत राघो गोवारी मराठी व इंग्रजी माध्यमाची शाळा कामोठे शहरात सुरु केली. कालांतराने ही शाळा बारावीपर्यंत शिक्षण देऊ लागली. विद्यार्थ्यांचादेखील उत्स्फूर्त प्रतिसाद या शाळेला मिळाला. शासन मान्यता असलेल्या या शाळेचा निकाल सुरुवातीपासून शंभर टक्के लागत आला आहे. विशेष म्हणजे कालानुरूप सूरदास गोवारी यांच्या मार्गदर्शनाने हभप गणपत राघो गोवारी शाळा कात टाकत राहिली. आधुनिक युगात आधुनिक शिक्षणाची जोड देत सीबीएसई बोर्डाशी संलग्न होऊन उच्च दर्जाचे शिक्षण ही शाळा देत आहे. सिडकोच्या सेक्टर ३६ भूखंड क्रमांक १५ वर सूरदास गोवारी यांच्या शिक्षण संस्थेच्या शाळेची भव्य इमारत उभी राहात आहे. या भव्य इमारतीत ४५ वर्ग खोल्या असणार आहेत. लवकरच ही प्रशस्त शाळा शहरात उभी राहणार आहे.

शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान देण्यावरच सूरदास गोवारी थांबले नाहीत, आपल्या महत्वाकांक्षेच्या जोरावर हॉटेल व्यवसाय व शिपिंगच्या व्यवसायातदेखील सूरदास गोवारी यांचे नाणे खणखणत आहे. आपली एकुलती एक मुलगी अश्विनीला वैद्यकीय शिक्षण देत (बीएएमएस) डॉक्टर केले. शिक्षण, हॉटेल तसेच शिपिंग व्यवसायात सूरदास गोवारी यांनी आजमावलेले नशीब यशस्वी ठरले आहे. २०१८ साली डी. एम. शीप रिपेअर्स प्रायव्हेट लिमिटेड नावाची कंपनी स्थापन केली. शिपिंग क्षेत्राशी निगडित या व्यवसायात मोठमोठ्या नौकांचे दुरुस्तीचे काम डी. एम. शीप रिपेअर्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनी करते. भारतासह इग्लंड, सिंगापूर, इस्त्रायल, व्हिएतनाम, श्रीलंका, मलेशिया यासारख्या देशातील ख्यातनाम बोटींची दुरुस्ती सूरदास गोवारी यांची शिपिंग कंपनी करते. आंतरराष्ट्रीय स्तरावर चालणाऱ्या या व्यवसायात नवी मुंबईमधील स्थानिक प्रकल्पग्रस्त सूरदास गोवारी यांनी आपला अटकेपार झेंडा फडकवला आहे.







## हॉटेल व्यवसायात पदार्पण

**सूरदास गोवारी यांनी कामोठे शहरातच बिल्डिंग मटेरियल सप्लायर्सचा व्यवसाय सुरू केला. बांधकाम क्षेत्राशी संबंध आल्याने हॉटेल व्यवसायातदेखील नशीब अजमावण्याचा प्रयत्न सूरदास गोवारी यांनी केला. कोकणातील फेव्हरेट टुरिस्ट डेस्टिनेशन असलेल्या दिवेआगर येथे १५ गुंठे जागेत १८ एसी रुम्सचे श्री गणेश बीच रिसॉर्ट सुरू केले. आजही हे बीच रिसॉर्ट पर्यटकांच्या पसंतीत उतरत असून गोवारी यांनी हॉटेल क्षेत्रात टाकलेले पाऊल यशस्वी करून दाखविले आहे.**

## विविध पुरस्कारांनी सन्मानित

*सूरदास यांना सिटी बेल मीडिया समूहाने यशस्वी उद्योजक या पुरस्काराने सन्मानित केले आहे. या व्यतिरिक्त अनेक संस्थांनी गौरविले आहे.*

## शिपिंग व्यवसायात अटकेपार झेंडा

***२०१८ साली डी एम शीप रिपेअर्स प्रायव्हेट लिमिटेड नावाची कंपनी स्थापन केली. शिपिंग क्षेत्राशी निगडित या व्यवसायात मोठ मोठ्या नौकांचे दुरुस्तीचे काम डी एम शीप रिपेर्स प्रायव्हेट लिमिटेड नावाची कंपनी करते. भारतासह इंग्लंड, सिंगापूर, इस्त्रायल, व्हिएतनाम, श्रीलंका, मलेशिया यासारख्या देशातील ख्यातनाम घोटींची दुरुस्ती सूरदास गोवारी यांची शिपिंग कंपनी करते. या बोटीचे इंजिनमधील बिघाड, महत्त्वाचे पार्टस (साहित्य) अथवा अँकर आदी विविध स्वरूपाची तांत्रिक कामे सूरदास गोवारी यांची डी एम शीप रिपेअर्स ही कंपनी करते. पूर्णपणे आंतरराष्ट्रीय चलनावर हा व्यवसाय चालतो. या व्यवसायातदेखील सूरदास गोवारी यांनी अटकेपार झेंडा फडकवला आहे.***



आई-वडिलांचे आशीर्वाद, कुटुंबियांची साथ तसेच प्रचंड इच्छाशक्तीच्या जोरावर आपण शिक्षण, हॉटेल तसेच शिपिंग क्षेत्रात हे यश मिळविले असल्याचे सूरदास गोवारी आवर्जुन सांगतात.



# वेस्ट इंडिज वर्ल्डकपमधून ‘आऊट’

## आयर्लंडचा नऊ गडी राखून मोठा विजय

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत नवख्या आयर्लंड संघाने वेस्ट इंडिज संघाचा नऊ गडी राखून पराभव केला. यासोबतच आयर्लंडने सुपर-१२मध्ये धडक दिली आहे, तर दोन वेळचा विश्वविजेता विंडीजचा संघ या प्रतिष्ठेच्या बाहेर झाला आहे.

ऑस्ट्रेलियात टी-२० विश्वचषक स्पर्धेत एकीकडे सराव सामने खेळवले जात आहेत, तर दुसरीकडे सुपर-१२मध्ये प्रवेश मिळवण्यासाठी आठ संघ आमनेसामने आले. यात शुक्रवारी (दि. २१) ब गटातील वेस्ट इंडिज आणि आयर्लंड यांच्यात सामना रंगला. विंडीजने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत पाच बाद १४६ धावा केल्या. आयर्लंडच्या संघाने हे लक्ष्य केवळ एक गडी गमावून १७.३ षटकांत पूर्ण केले.



वेस्ट इंडिजने दिलेल्या १४६ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना आयर्लंडच्या फलंदाजांनी शानदार खेळी केली. सलामीवीर पॉल स्टर्लिंग आणि अ‍ॅण्ड्र्यू बालबर्नी यांनी सुरुवातीपासूनच आक्रमक खेळी करून विंडीजच्या गोलंदाजांवर दबाव टाकला. कर्णधार बालबर्नी २३ चेंडूंत ३७ धावा करून बाद झाला. त्यानंतर सलामीवीर स्टर्लिंग याने ४८ चेंडूंत नाबाद ६६ धावांची खेळी करून आयर्लंडच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. संघाच्या विजयात यष्टीरक्षक फलंदाज लॉर्कन टकर याने ४५ धावांची नाबाद खेळी करून मोठा हातभार लावला. विंडीजकडून अकेल हुसैन व्यतिरिक्त कोणत्याच फलंदाजाला बळी घेण्यात यश आले नाही.

तत्पूर्वी वेस्ट इंडिजने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. विंडीजकडून ब्रँडन किंगव्यतिरिक्त कोणत्याच फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. किंगने ४८ चेंडूंत ६२ धावांची नाबाद खेळी करून एकतर्फी झुंज दिली. आयर्लंडकडून गॅरेथ डेलनीने सर्वाधिक तीन बळी टिपले, तर बॅरी मॅककार्थी आणि सिमी सिंग यांना प्रत्येकी एक गडी बाद केला.

दुसर्‍या सामन्यात झिम्बाब्वेने स्कॉटलंडचा पराभव करीत सुपर १२मध्ये प्रवेश केला आहे.

## पिंच्याक सिलॅट स्पर्धेत अनुजला ‘कांस्य’

**पाली : प्रतिनिधी**

श्रीनगर येथे नुकत्याच झालेल्या सहाव्या एशियन पिंच्याक सिलॅट स्पर्धेत पालीतील अनुज सरनाईकने कांस्यपदक प्राप्त केले. अनुजने आपल्या उत्कृष्ट खेळीने १७ देशांतील २८६ खेळाडूंमध्ये टॅंडिंग फाईट प्रकारात कांस्यपदकांची कमाई केली.

या स्पर्धेत भारतीय संघातून ५७ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यामध्ये महाराष्ट्रातील १६ खेळाडूंचा समावेश होता.



त्यापैकी १४ खेळाडूंनी पदके जिंकली, असे पिंच्याक सिलॅट फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष किशोर येवले यांनी सांगितले.

या स्पर्धेचे उद्घाटन लेफ्टनंट गव्हर्नर मनोज सिन्हा यांच्या करण्यात आले. या वेळी जम्मू काश्मीरचे विभागीय आयुक्त पी. के. पाल, युवा सेवा व क्रीडा विभागाचे आयुक्त सरमद हमीज, पोलीस उपायुक्त विजय कुमार, क्रीडा परिषदेचे सचिव नुजहत गुल, इंडिया पिंच्याक सिलॅट फेडरेशन राष्ट्रीय अध्यक्ष किशोर येवले, सचिव मुक्ती हमीद यासीन, व्यवस्थापकीय संचालक मोहम्मद इकबाल, इंटरनॅशनल पिंच्याक सिलॅट फेडरेशनचे सचिव टेडी सुरतमद आदी उपस्थित होते.

## पाकिस्तानला धक्का; शान मसूद दुखापतग्रस्त

**पर्थ : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेतील भारत-पाक सामना रविवारी (दि. २३) होणार आहे. या हायव्होल्टेज सामन्यापूर्वी पाकिस्तानसाठी वाईट बातमी समोर येत आहे. नेट सेशनमध्ये दुखापत झाल्यानंतर टीमचा बॅट्समन शान मसूद हॉस्पिटलमध्ये पोहचला आहे.

नेट सत्रादरम्यान मोहम्मद नवाजचा एक चेंडू शान मसूदच्या डोक्याला लागला. हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांच्या तपासणीनंतर त्याची दुखापत किती गंभीर आहे ते समजेल. मसूदची दुखापत गंभीर असल्याचे आढळल्यास भारताविरुद्धच्या पहिल्या सामन्यालाही त्याला मुकावे लागू शकते. ३३ वर्षीय शान मसूदने १२ टी-२० सामने खेळले आहेत. त्यात त्याने एकूण २२० धावा जमवल्या आहेत. भारताविरुद्धच्या सामन्याला मुकल्यास अशा परिस्थितीत अलिकडेच १५ जणांच्या संघात समाविष्ट करण्यात आलेल्या फखर जमानचा प्लेइंग इलेव्हनमध्ये समावेश होण्याची शक्यता आहे.








आठवे पुण्यस्मरण



कु. वर्षा विश्वनाथ कोळी

पुण्यस्मरणानिमित्त विनम्र अभिवादन!

दिवस दिवस वाढत जातो
अंधारही थोडासा आशावादी होतो
एक पणती तेवत असते
आठवण म्हणून श्रद्धांजलीसाठी जागत असते

आपले विनीत
विश्वनाथ काथोर कोळी आणि परिवार
(गव्हाण-पनवेल)








दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगु ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com